साऊथ इंडियन / पावभाजी / पंजाबी डिशेस / छोले भटूरे / पावभाजी / मिल्कशेक
नगरकर खवय्यांच्या पसंतीस उतरलेला
साऊथ इंडियन
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
एल.जी.शोरुम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो. 85306 40202
पार्सल सुविधा उपलब्ध..

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. १३.०८.२०२६ | अंक नं. ११५ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

तुमच्या बॉर्न बेबीची काळजी तुमच्याप्रमाणे आम्हालाही
नवजात बाळासाठी सर्व काही इथेच...
आता पुण्यात सुद्धा..
। स्वेटर । जॅकेट । झबले । टोपी । लंगोट । गादी ।
। मच्छरदाणी । बंडी । कॅप । टॉवेल । कपाट ।
। प्लास्टीक ड्रायशिट । सॉक्स । हातमोजे व बरेच काही.
जरीवाला
कापड बाजार, नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉइंट | पॉइंट्सवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

१५ ऑगस्ट २०२६
स्वातंत्र्यदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
Accuprobe Diagnostics यांच्या विद्यमाने
विशेष सवलत दरात रक्त तपासणी
बॉडी चेकअप फक्त 1200/-
ॲलर्जी तपासणी फक्त 4450/-
फ्री होम व्हिजीट 9970326623

# अहिल्यानगरमधील नगरसेवकाला थेट दक्षिण आफ्रिकेमधून दिली धमकी

## इंस्टाग्रामवर व्हिडिओ टाकून बदनामीचा इशारा, गुन्हा दाखल

नगर - महानगरपालिकेचे नगरसेवक शम्स समीर खान ऊर्फ शम्स समीउल्ला खान (वय ३०, रा. गोविंदपुरा) यांना इंस्टाग्रामवर मेसेज करून धमकावल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. २४ तासांत वक्तव्य न केल्यास इंस्टाग्रामवर व्हिडिओ प्रसिद्ध करून बदनामी करण्याची धमकी त्यांना देण्यात आली आहे. या प्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शम्स खान हे गोविंदपुरा येथील ७ नंबर बंगल्यात राहतात. ११ ऑगस्ट रोजी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास त्यांना एका इंस्टाग्राम आयडीवरून मेसेज आला. आरोपी आकीब असीफ सय्यद (वय ३०, मूळ रा. मुकुंदनगर, सध्या रा. दक्षिण आफ्रिका) याने हा मेसेज पाठवला होता. 'येत्या २४ तासांत काहीतरी स्टेटमेंट दे, नाहीतर तुझा व्हिडिओ टाकून तुझी इंस्टाग्रामवर बदनामी करेन,' अशी धमकी आरोपीने दिली. या धमक्यांमुळे नगरसेवक शम्स खान यांनी १२ ऑगस्ट रोजी कॅम्प पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार नोंदवली. त्यांच्या तक्रारीवरून पोलीस हवालदार रामनाथ डोळे यांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५३ (१) आणि (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार अहमद इनामदार या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. परदेशात बसून दिलेल्या या धमकीमुळे शहरात मोठी खळबळ उडाली असून पोलीस सायबर यंत्रणेच्या मदतीने तपास करत आहेत.

# मॉलमध्ये खरेदीदरम्यान महिलेच्या पर्समधून रोकडची चोरी

नगर -शहरातील नगर कॉलेजजवळ असलेल्या झुडिओ शॉपिंग मॉलमध्ये खरेदीसाठी आलेल्या एका महिलेच्या पर्समधून १५ हजार रुपयांची रोकड अज्ञात चोरट्याने पळवल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शेवगाव येथील खंडोबानगर परिसरात राहणाऱ्या सारीका संजय लांडगे (वय ४५) या ११ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेसात ते रात्री नऊच्या सुमारास नगर कॉलेजजवळील झुडिओ मॉलमध्ये खरेदीसाठी आल्या होत्या. मॉलमध्ये ग्राहकांची मोठी गर्दी होती. या गर्दीचा गैरफायदा घेत एका अज्ञात इसमाने सारीका लांडगे यांच्या नकळत त्यांच्या जवळील पर्समधून १५ हजार रुपयांची रोख रक्कम शिताफीने चोरून नेली. खरेदी पूर्ण झाल्यानंतर पैसे देण्यासाठी पर्स तपासली असता रोकड गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.याप्रकरणी सारीका लांडगे यांनी तात्काळ कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३ (२) नुसार आरोपीविरोधात गुन्हा नोंदवला आहे.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन कोतवालीचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सुधीर क्षीरसागर हे या चोरीचा पुढील तपास करत आहेत.

माादी कुत्री हरवली आहे
वय ७, नाव - फीबी, तपकिरी कलर, कपाळावर पांढरा टिळा, पंजे व छाती पांढरा कलर गळ्यात काळा पट्टा
कुत्री कुणाला सापडल्यास
बक्षीस ५०००/-
खालील नंबरवर संपर्क करावा
दिनेश खंडेलवाल, कराचीवाला नगर, अहिल्यानगर
9028311809, 7263046099, 9403730551

फक्त ७ दिवसांत Tally शिका.
स्कॉलर कॉम्प्युटर्स
नवीपेठ रस्ता, महापालिका दवाखान्याच्या मागे, अहिल्यानगर.
ऑफीस वेळ - सकाळी ८ ते सकाळी १० (चौकशीसाठी)
9921754135

तुम्ही ॲलर्जीने त्रस्त आहात का?
वारंवार होणारी सर्दी, खोकला व दमा विकार
शरीरावर लाल चट्टे येऊन अंग सुजणे व खाज येणे.
ॲलर्जी कमी करण्यासाठी औषधे घ्यावी लागणे.
नेहमी डोळ्यांना खाज सुटणे व डोळे लाल होणे.
"अहिल्यानगर ॲलर्जी टेस्टिंग सेंटर"
डॉ. कृष्णा बलदवा
:नवीन पत्ता:
जुने वाळिंबे हॉस्पिटल, वर्धमान टायर समोर, वांबु गल्ली, धरती चौक, अहिल्यानगर
Mo. 8390907414 / 9422227414
सोमवार ते शनिवार * वेळ : स. १० ते २:३०सायं. ६ ते ९. पर्यंत
रविवार * वेळ : स. १० ते दु. १ पर्यंत

कोहिनूर® सादर करीत आहेत,
4 दिवस आनंदाचे
13th AUG | 14th AUG | 15th AUG | 16th AUG
शर्ट ) टी-शर्ट ) जीन्स ) ट्राऊजर ) शेरवानी ) जोधपुरी ) कुर्ता पायजामा ) इंडोवेस्टर्न ) बंडी जॅकेट ) सुटिंग ) शर्टींग ) डिझायनर साड्या ) सुरत साडी ) शालू ) नऊ वार ) घागरा ओढणी
सर्वकाही 25%* दणदणीत सुटमध्ये
सदा सर्वदा सर्वोत्तम कपडे
कोहिनूर®
एम.जी. रोड | कोहिनूर मॉल, सावेडी, अहिल्यानगर 7447 7447 90
सागर स्वीट जवळ, कॉलेज रोड, नाशिक 7378 404 404

सादरकर्ते: सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल
अहिल्यासरस्वती महोत्सव
मुख्य प्रायोजक: MAHAVIR GROUP
महिला बाईक रॅली | अहिल्या सरस्वती पुरस्कार | फॅशन रनवे | ॲक्ट - माझ्या आयुष्यातली 'अहिल्या'
ऑडिशन
AHILYANAGAR FASHION RUNWAY
BIGGEST FASHION SHOW
अहिल्यानगर फॅशन रनवे
१५ ऑगस्ट २०२६ | सकाळी ९.३० ते सायं. ५.००
स्थळ - नंदनवन लॉन्स, न्यू टिळक रोड, अहिल्यानगर
प्रवेश विनामूल्य
ऑडिशन्स (म/पु)
पालक आणि मी वॉक | डॉक्टर्स वॉक
डिझायनर फॅशन रनवे (पारंपरिक व वेस्टर्न | वय १५ वर्षांवरील)
गर्भवती महिलांसाठी वॉक
नवोदितांनी नक्की सहभागी व्हावे | पोशाख, मेकअप, दागिने आणि प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध
प्रायोजक व पार्टनर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## सोशल मीडियावर वादग्रस्त कमेंट करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

नगर - सोशल मीडियावरून दोन समाजात तेढ निर्माण होईल अशा प्रकारच्या वादग्रस्त कमेंट केल्याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात दोन वेगवेगळ्या व्यक्तींवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याप्रकरणी पोलीस कर्मचाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी कारवाई केली आहे.

पहिली घटना तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. इन्स्टाग्रामवरील 'shoebshaikh7028' या अकाऊंटधारकाने समाजात वाद निर्माण करणारी कमेंट सोशल मीडियावर पोस्ट केली होती. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार तनवीर सलीम शेख यांनी दिलेल्या तक्रारीवरून संबंधित अकाऊंटधारकाविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक दळवी करत आहेत.

दुसऱ्या घटनेत, इन्स्टाग्रामवरील 'Mahesh_palwe_18' या अकाऊंटवरून दोन समाजात वितुष्ट निर्माण होईल अशी आक्षेपार्ह कमेंट करण्यात आली. यासंदर्भात पोलीस अंमलदार योगेश सिताराम खामकर यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून संबंधित अकाऊंट चालवणाऱ्या इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपासही पोलीस उपनिरीक्षक दळवी यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. नागरिकांनी सोशल मीडियावर वक्तव्य करताना काळजी घ्यावी व शांतता बाळगावी, असे आवाहन पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांनी केले आहे.

## मावा बनविणाऱ्या अड्ड्यावर महिनाभरात पुन्हा पोलिसांचा छापा

### १ लाख ४३ हजारांचा मुद्देमाल जप्त, तिघांवर गुन्हा दाखल, एक जण ताब्यात



नगर तालुक्यातील जेऊर बायजाबाई परिसरातील ससेवाडी रोडवर मावा बनविणाऱ्या अड्ड्यावर छापा टाकून एकाला पकडल्यानंतर त्याच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

नगर - नगर तालुक्यातील जेऊर बायजाबाई परिसरातील ससेवाडी रोडवर सुगंधीत तंबाखू व सुपारीचे मिश्रण करून मावा तयार करणाऱ्या अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेने १२ ऑगस्ट रोजी छापा टाकून तब्बल १ लाख ४३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. विशेष म्हणजे, याच ठिकाणी सुमारे महिनाभरापूर्वी कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा मावा तयार करण्याचे काम सुरू असल्याचे समोर आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

जिल्ह्यातील अवैध व्यवसायांविरोधात कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिले आहेत. त्यानुसार पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नगर तालुक्यातील जेऊर बायजाबाई परिसरात अवैध व्यवसायांची माहिती घेत असताना ससेवाडी रोडवरील एका पत्र्याच्या शेडमध्ये मावा तयार केला जात असल्याची गुप्त माहिती मिळाली.

मिळालेल्या माहितीची खात्री करून पोलिसांनी पंचांसमक्ष छापा टाकला. यावेळी सुगंधीत तंबाखू आणि सुपारी एकत्र करून मावा तयार करत असलेला बबलु बापू ससे (वय २३, रा. आठरे वस्ती, ससेवाडी) याला पोलिसांनी ताब्यात घेतले.

या कारवाईत ३० हजार रुपये किमतीचा १५ किलो तयार मावा, ६३ हजार रुपये किमतीचा ९० किलो सुपारीचा चुरा, १५ हजार रुपये किमतीची १५ किलो सुगंधीत तंबाखू आणि ३५ हजार रुपये किमतीची १७.५० किलो सुगंधीत तंबाखू, असा एकूण १ लाख ४३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ताब्यातील व्यक्तीकडे पोलिसांनी चौकशी केली असता, जप्त केलेला मुद्देमाल हा शशिकांत रामदास मगर (रा. मगर वस्ती, ससेवाडी रोड, जेऊर बायजाबाई) याच्या मालकीचा असल्याचे तसेच तो छत्रपती संभाजीनगर येथील जितु मालपाणी( पुर्ण नाव माहीत नाही) याने पुरविल्याचे सांगण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. दोघेही फरार असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास एमआयडीसी पोलीस करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार विजय ठोंबरे, अतुल लोटके, संदीप पवार, निळकंठ कारखेले, रणजीत जाधव, सागर ससाणे, योगेश कर्डिले, दीपक जाधव व अमृत आढाव यांच्या पथकाने केली.



किशोरसंस्था संवर्धनी प्रशालेमध्ये 'कब-बुलबुल युनिट'चे उद्घाटन आणि वचनविधी सोहळा पार पडला.

## अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या किशोर संस्था संवर्धनी प्रशालेत 'कब-बुलबुल युनिट'चे उद्घाटन

नगर - अहमदनगर एज्युकेशन सोसायटी संचालित किशोरसंस्था संवर्धनी प्रशालेमध्ये 'कब-बुलबुल युनिट'चे उद्घाटन पार पडले.

प्रमुख पाहुण्या म्हणून सौ. स्मिता उकिरडे उपस्थित होत्या. प्रशालेच्या मुख्याध्यापिका श्रीमती गोत्राळ वनिता यांनी स्वागत केले.

कार्यक्रमाच्या मुख्य टप्प्यात कब-बुलबुल युनिटच्या विद्यार्थ्यांचा वचनविधी सोहळा पार पडला. मुख्याध्यापिका श्रीमती गोत्राळ आणि प्रशालेचे शिक्षक श्री. खर्डे श्रीकांत यांनी विद्यार्थ्यांना कब-बुलबुलच्या ध्येय-धोरणांची, सेवाभावाची व निष्ठेची शपथ (वचनविधी) दिली.

प्रमुख पाहुण्या सौ. स्मिता उकिरडे यांनी सांगितले की, कब-बुलबुल आणि स्काऊट-गाईड चळवळीमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, सेवाभाव, बंधुता आणि नेतृत्वगुणांचा विकास होतो. लहान वयातच मिळणारे हे संस्कार भावी आयुष्यात उत्तम नागरिक घडवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरतात.सूत्रसंचालन व आभार सौ. कविता रच्चा यांनी केले. कार्यक्रमास शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

## गावठी कट्टा विकायला आलेल्या तरुणासह दोघांना पोलिसांनी पकडले; १ लाख १९ हजारांचा मुद्देमाल जप्त

नगर - जिल्ह्यात अवैध शस्त्र विक्रीसाठी आलेल्या एका तरुणाला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने फिल्मी स्टाईलने जेरबंद केले आहे. या कारवाईत बिहारमधील एका तरुणासह दोघांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याकडून १ गावठी कट्टा, ४ जिवंत काडतुसे आणि मोबाईलसह एकूण १ लाख १९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अहिल्यानगर जिल्ह्यात दाखल होणारे गंभीर गुन्हे आणि सराईत गुन्हेगारांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी १२ ऑगस्ट रोजी रात्री जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशन हद्दीत 'कोंबिंग ऑपरेशन' राबवण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड, संदिप दरवडे व पोलीस अंमलदार अरूण गांगुर्डे, सोमनाथ झांबरे, गणेश धोत्रे, बाळसाहेब नागरगोजे, अशोक लिपणे, प्रशांत राठोड, किशोर शिरसाठ व अरूण मोरे यांचे विशेष पथक तयार करून त्यांना कारवाईबाबत सूचना दिल्या होत्या.

या मोहिमेदरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे पथक भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन हद्दीत गस्त घाबत असताना, भिंगार नाला परिसरात बिहारमधील एक तरुण गावठी कट्टा विक्री करण्यासाठी येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ भिंगार नाला परिसरात सापळा रचला. तेथे दोन संशयित तरुण थांबलेले दिसून आल्याने पथकाने पंचासमक्ष छापा टाकून त्यांना ताब्यात घेतले.

तपासणीदरम्यान त्यांची नावे विकास कमल यादव (वय १८, रा. गंगापूर, ता. नखानूर, जि. मधुबानी, बिहार राज्य) आणि ओमकार अनिल शिंदे (वय २१, रा. भिंगार, अहिल्यानगर) असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी पंचासमक्ष घेतलेल्या अंगझडतीत त्यांच्याकडून ५० हजार रुपये किमतीचे एक गावठी बनावटीचे पिस्टल, २ हजार रुपये किमतीची दोन जिवंत काडतुसे, ७ हजार रुपये किमतीची स्टीलची मॅगझीन व त्यात दोन काडतुसे आणि ६० हजार रुपये किमतीचे दोन मोबाईल असा एकूण १ लाख १९ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी ताब्यातील आरोपींविरोधात भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन येथे आर्म क्ट ३/२५ आणि ७/२५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास भिंगार कॅम्प पोलीस करत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी व अंमलदारांनी पार पाडली आहे.



नगरमध्ये गावठी कट्टा विकायला आलेल्या बिहारच्या तरुणासह दोघांना पकडल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

## इस्रोच्या श्रीहरीकोटा येथील अंतराळ केंद्रास विद्यार्थ्यांची प्रेरणादायी भेट

### 'केअर फॉर यू' फाउंडेशनच्या ४३ विद्यार्थ्यांना अंतराळ विज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव



श्रीहरीकोटा येथील इस्रोच्या अंतराळ केंद्राला 'केअर फॉर यू' फाउंडेशनच्या विद्यार्थ्यांनी भेट देऊन अंतराळ विज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

नगर - 'केअर फॉर यू' फाउंडेशनच्या वतीने १० ऑगस्ट रोजी श्रीहरीकोटा येथील भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) येथे शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले. या भेटीत महाराष्ट्रातील विविध बालसंगोपन संस्थांमधील ४३ विद्यार्थी आणि ३० स्वयंसेवक सहभागी झाले. भारताच्या अंतराळ संशोधनातील प्रगतीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची ही विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय संधी ठरली.

या पथकासोबत 'केअर फॉर यू' फाउंडेशनचे मुख्य सल्लागार तथा महाराष्ट्र राज्याचे अपर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण व विशेष पथके) कृष्ण प्रकाश राजमोहन प्रसाद, यांच्या विशेष उपस्थितीमुळे विद्यार्थ्यांना मोठी प्रेरणा मिळाली. यावेळी सीए प्रसाद भंडारी, ड. कौवल्य कुलकर्णी, सिद्धार्थ गोंगडे, स्मिता सारडा आणि मधुसूदन सारडा आदी मान्यवर उपस्थित होते.

या संपूर्ण भेटीत विद्यार्थ्यांना ज्ञान, संवाद आणि प्रेरणेची अनोखी अनुभूती मिळाली. इस्रोमधील वरिष्ठ अधिकारी व शास्त्रज्ञांशी संवाद साधण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. भारताच्या अंतराळ मोहिमांमागील मेहनत, अचूकता, शिस्त आणि समर्पण याची माहिती विद्यार्थ्यांना मिळाली. या भेटीचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे इस्रोचे अध्यक्ष श्री. व्ही. नारायणन यांच्याशी बंगळूर येथून झालेला ऑनलाइन व्हिडिओ संवाद. आपल्या अत्यंत व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांचा हा संवाद विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी आणि अविस्मरणीय ठरला.

इस्रोतर्फे करण्यात आलेल्या सर्व व्यवस्थाही अत्यंत प्रशंसनीय होत्या. बस वाहतूक, निवास, भोजन आणि इतर आवश्यक सुविधांची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. विद्यार्थ्यांना श्रीहरीकोटा येथील पहिले व दुसरे प्रक्षेपण केंद्र तसेच नियंत्रण कक्षाला भेट देण्याची संधी मिळाली. भारताच्या ऐतिहासिक अंतराळ मोहिमा ज्या ठिकाणाहून पार पडतात, त्या अत्याधुनिक सुविधांची प्रत्यक्ष माहिती मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या ज्ञानात मोठी भर पडली.

या भेटीतील विशेष उल्लेखनीय भाग म्हणजे श्री. एन. कुमार, ग्रंथालय अधिकारी-ड, एलआयआरडी/एमएसए, एसडीएससी-शार, इस्रो, श्रीहरीकोटा यांच्याशी झालेला सविस्तर संवाद. त्यांनी अत्यंत शांतपणे आणि सोप्या भाषेत अंतराळ विज्ञानातील अनेक बारकावे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले तसेच त्यांच्या विविध प्रश्नांची उत्तरे दिली. त्यांच्या संवादामुळे अंतराळ विज्ञानासारखा जटिल विषय विद्यार्थ्यांसाठी अधिक सोपा, रंजक आणि समजण्यासारखा झाला.

'केअर फॉर यू फाउंडेशन ला इस्रोमधील अनेक मान्यवर अधिकारी आणि शास्त्रज्ञांना भेटून त्यांचा सत्कार करण्याचा मानही मिळाला. यामध्ये प्रतिष्ठित शास्त्रज्ञ व संचालक एस. मुथुचेलझियन, उपसंचालक पी. गोपी कृष्णा आणि व्ही. बास्करन यांचा समावेश होता. तसेच संचालक श्री. शुक्ला आणि इतर शास्त्रज्ञांनी विद्यार्थ्यांना हिंदी भाषेत विविध तांत्रिक बाबी अत्यंत सोप्या पद्धतीने समजावून सांगितल्या. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना अनेक तांत्रिक संकल्पना सहज समजल्या.

## आकाशवाणीवर वेद कुलकर्णी यांची १४ ऑगस्टला मुलाखत



नगर - येथील सिव्हील हडको परिसरातील रहिवासी व रक्तदाते वेदकुमार रविंद्र कुलकर्णी यांची 'रक्तदान जीवनदान' या विषयावरील मुलाखत १४ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५.३० वा. नगर आकाशवाणीवरील 'युवा वाणी' या कार्यक्रमात प्रक्षेपित होणार आहे. नागरिकांमध्ये व युवकांमध्ये रक्तदानाविषयी जनजागृती होण्यासाठी मुलाखतीचे आयोजन करण्यात आले आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ठ वर्णन केलेली प्लॉट मिळकत ही विद्यमान मालक **दिपक रावसाहेब खांडे व मनिषा दिपक खांडे रा. बेल पिंपळगांव ता.नेवासा जि.अहिल्यानगर** यांचे मालकी वहीवाटीची आहे. सदर प्लॉट मिळकत त्यांच्या प्रत्यक्ष कब्जात आहे. खाली नमुद केलेल्या प्लॉट मिळकतीचा विक्रीचा व्यवहार आमच्या आशिलाबरोबर ठरला असून आमच्या आशिलाकडून विद्यमान मालक यांनी विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर प्लॉट मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहिर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद मिळकत बाबत कोणताही चाल वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७)** दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्यासह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर प्लॉट मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन** :- डि।। अहिल्यानगर सब डि।। तालुका नगरपैकी अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे सावेडी येथील सर्व्हे नं. ३०५/२/३/२ मधील प्लॉट नं. २९ याचे एकुण क्षेत्रफळ १६६.७९ चौ. मी. ही संपूर्ण खुली प्लॉट मिळकत.**

**यांसी चतःसिमा :-**
पुर्व :- ६ मी.रस्ता, दक्षिण :- प्लॉट नं. २८,
पश्चिम :- प्लॉट नं. २६, उत्तर :- प्लॉट नं. ३०,
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.
अहिल्यानगर, दिनांक :- १३/०८/२०२६

**ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे**
**ॲड. ओंकार पंडीत मोरे**
मो.नं. ९८६०६४६४६३ ऑफिस- गाळा नं. ४, महालक्ष्मी चेंबर्स, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर.


## वारस हक्काची नियुक्ती रखडली; सफाई कर्मचारी संघटनेचा आक्रमक पवित्रा; १५ ऑगस्टला आत्मदहनाचा इशारा

नगर - लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार वारस हक्काने नियुक्ती आदेश देण्यात यावा, तसेच अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या विविध मागण्यांची तातडीने पूर्तता करावी, या मागणीसाठी अखिल महाराष्ट्र सफाईगार व चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनेने आक्रमक पवित्रा घेतला आहे. संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय तसेच राहुरी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देऊन प्रलंबित प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे.

कै. श्याम अमीर बिवाल यांच्या पत्नी शिलाबाई बिवाल यांनीही आपल्या प्रलंबित नोकरीच्या प्रश्नावर तातडीने निर्णय न झाल्यास १५ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालया समोर आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. तसेच प्रशासनाने या मागणीवर तातडीने कार्यवाही न केल्यास आंदोलनाचा इशारा संघटनेने दिला आहे. जिल्ह्यातील विविध नगरपरिषदांमधील सफाई कर्मचारी तसेच संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या सहभागातून १८ ऑगस्ट रोजी राहुरी नगरपरिषद कार्यालयासमोर 'भव्य झाडू आंदोलन' करण्यात येणार आहे.

राहुरी नगरपरिषदेमध्ये सफाई कर्मचारी म्हणून कार्यरत असलेले कै. श्याम अमीर बिवाल यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या पदावर लाड-पागे समितीच्या धोरणानुसार वारस हक्काने सौ. ज्योती मनीष सोलंकी यांचे नाव नामनिर्देशित करण्यात आले आहे. नियुक्तीसाठी आवश्यक असलेली सर्व कायदेशीर कागदपत्रांची पूर्तता वारसांकडून यापूर्वीच करण्यात आली असल्याचा दावा संघटनेने केला आहे. मात्र, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करूनही अद्याप नियुक्ती आदेश देण्यात आलेला नसल्याने बिवाल कुटुंबीयांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे.

## ज्योतीताई कोठुळे यांचे दु:खद निधन



नगर - खडकी येथील रहिवासी सौ. ज्योतीताई दादासाहेब कोठुळे (वय ३८) यांचे १३ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर खडकी अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, १ मुलगा असा परिवार आहे.

## किसन लोया यांचे दु:खद निधन



नगर - नवीन टिळक रोडवरील संदीप स्क्रिन पुजारा कॉम्प्लेक्स येथील रहिवासी किसन शंकरलाल लोया (वय ८४) यांचे १३ ऑगस्ट रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. संदीप लोया यांचे वडील तर कुणाल व कौस्तुभ लोया यांचे ते आजोबा होत. त्यांच्या मागे १ मुलगा, सुना, नातवंडे, नात सून असा परिवार आहे.

## बांधकामावर सुरक्षेअभावी मजुराचा उंचावरून पडून मृत्यू

नगर - बांधकामाच्या ठिकाणी आवश्यक ती सुरक्षेची साधने न पुरवल्यामुळे उंचावरून पडून एका मजुराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना अमरधाम परिसरात घडली आहे. याप्रकरणी निष्काळजीपणाचा ठपका ठेवत बांधकाम ठेकेदार अजिज बेग याच्याविरोधात कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अनिता कैलास जाधव यांचे पती कैलास किसन जाधव (वय ४६, रा. निंबोडी, ता. अहिल्यानगर) हे ठेकेदार अजिज बेग (रा. आलमगीर भिंगार) यांच्याकडे अमरधाम येथील बांधकाम साईटवर मजुरीचे काम करत होते. २ जुलै रोजी दुपारी ३:३० वाजेच्या सुमारास प्लॅस्टरचे काम करत असताना पाय घसरून कैलास जाधव हे उंचावरून खाली पडले. सुरक्षेची कोणतीही उपाययोजना नसल्याने त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती.

त्यांच्यावर पॅसिफिक हॉस्पिटल अहिल्यानगर येथे वैद्यकीय उपचार सुरू असताना ७ जुलै रोजी त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी अनिता जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलिसांनी ठेकेदार अजिज बेग याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०६ आणि २९० अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## दुकान फोडून ऐवज लंपास

नगर - कामरगाव (ता. नगर) येथे दुकानाच्या पत्र्याच्या शेडची मागील बाजू उचकटून चोरट्याने सुमारे ५० हजार ७०० रूपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना ८ ऑगस्ट रोजी पहाटेच्या सुमारास घडली. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अनिल शिवाजी आभाने (वय ४२, रा. कामरगाव) यांनी फिर्याद दिली आहे. अनिल आभाने यांचे काम रगाव शिवारात दुकान पत्र्याच्या शेडमध्ये आहे.

शनिवारी पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास चोरट्याने दुकानाच्या पत्र्याच्या शेडच्या मागील बाजूचा पत्रा उचकटून आत प्रवेश केला. चोरट्याने दुकानातील विविध वस्तू तसेच रोख रक्कम असा एकूण ५० हजार ७०० रूपयांचा मुद्देमाल चोरून नेला.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली प्लॉटस् मिळकत विद्यमान मालक **विजय पोपटलाल मेहेर, रा. अहिल्यानगर** यांच्या मालकीचे असुन सदर प्लॉटस् मिळकतींचा व्यवहार आमच्या अशिलाबरोबर ठरलेला असुन लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर प्लॉटस् मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही कोणतीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, **कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, साठेखत, खरेदीखत, करारनामा, मनाई, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस** त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **०७ (सात)** दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर प्लॉटस् मिळकत खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल याची नोंद घेण्यांत यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णनः**- जिल्हा अहिल्यानगर पोट तुकडी व तालुका नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे सावेडी येथील सर्व्हे नं. २७७/१ब १/१ब २/२ब १/२ब २/३अ/४अ/५ मधील प्लॉटस् चे वर्णन खालील प्रमाणे -

| प्लॉट नं. | क्षेत्रफळ चौ. मीटर | यांसी चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पुर्वेस | पश्चिमेस | दक्षिणेस | उत्तरेस |
| ७७ | १४२.७३ | ओपन स्पेस | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. ७८ | प्लॉट नं. ७६ |
| ७८ | १५०.६१ | ओपन स्पेस | ९ मीटर रस्ता | सर्व्हे नं. २७७ पैकी | प्लॉट नं. ७७ |
| हे संपुर्ण प्लॉटस् मिळकतीबाबत. | | | | | |

दि.१३/०८/२०२६.
अहमदनगर.

**ॲड. तुषार अशोक महानुर**
गुलमोहर रोड, सावेडी, अहमदनगर. मो.नं. ९२८४१२५९८९

# गृहिणी

## आरोग्य

### बालकांचे पोषण आणि रोगप्रतिकारशक्ती

लहान मुलांचे पोषण आणि त्यांची रोगप्रतिकारशक्ती हा त्यांच्या सर्वांगीण शारीरिक व मानसिक विकासाचा मुख्य पाया आहे. बालपणात मिळणारा योग्य आणि संतुलित आहार मुलांच्या भविष्यातील आरोग्याची दिशा ठरवतो. जन्मापासून पहिल्या सहा महिन्यांपर्यंत केवळ आईचे दूध हेच बाळासाठी सर्वोत्तम अन्न असते, जे त्याला विविध आजारांपासून वाचवते. सहा महिन्यांनंतर बाळाला मऊ, पचायला हलका आणि पौष्टिक असा वरचा आहार सुरू करावा, ज्यामध्ये भाताची पेज, वरणाचे पाणी आणि शिजवलेल्या भाज्या असाव्यात. वाढत्या वयात मुलांच्या आहारात प्रथिने, जीवनसत्त्वे आणि खनिजांचा योग्य समतोल असणे गरजेचे आहे. प्रथिनांसाठी डाळी, मूग, अंडी आणि दूध फायदेशीर ठरतात, जे शरीराची वाढ करण्यास मदत करतात. रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी संत्री, मोसंबी, आवळा आणि पेरू यांसारख्या फळांचा आहारात समावेश करावा. हिरव्या पालेभाज्यांमधून मिळणारे लोह मुलांचे रक्त वाढवण्यास मदत करते, तर बदाम आणि अक्रोड यांसारखा सुकामेवा मेंदूच्या विकासासाठी उत्तम असतो. आजकाल मुलांमध्ये बाहेरचे चमचमीत आणि पॅक केलेले पदार्थ खाण्याचे प्रमाण वाढले आहे, ज्यामुळे पचनक्रिया बिघडते; म्हणूनच अशा अन्नापासून मुलांना दूर ठेवावे. आहारासोबतच पुरेसे पाणी, योग्य झोप आणि दररोज मैदानावर खेळणे तितकेच गरजेचे आहे. नैसर्गिक आहारातून पोषक तत्त्वे मिळाल्यास मुले वारंवार आजारी पडत नाहीत आणि त्यांचा विकास वेगाने होतो.

## पाककला

### काजू करी (काजूची भाजी)

**साहित्य :** काजू १ कप, बारीक चिरलेला, कांदा २, टोमॅटो प्युरी १ कप, आले-लसूण पेस्ट १ चमचा, बटर २ चमचे, तेल २ चमचे, जिरे १/२ चमचा, हळद १/२ चमचा, लाल तिखट १ ते २ चमचे, गरम मसाला १ चमचा, कसुरी मेथी १ चमचा, फ्रेश क्रीम (किंवा साय) २ चमचे, चवीनुसार मीठ, बारीक चिरलेली कोथिंबीर १ चमचा.

**कृती :** एका कढईत १ चमचा बटर किंवा तेल गरम करून काजू हलके सोनेरी होईपर्यंत तळून बाजूला काढून घ्या. आता त्याच कढईत तेल आणि उरलेले बटर गरम करा. त्यात जिरे घाला. जिरे तडतडल्यावर बारीक चिरलेला कांदा घालून तो गुलाबी रंगावर परतून घ्या. त्यानंतर आले-लसूण पेस्ट घालून १ मिनिट परता. आता टोमॅटो प्युरी घालून मिश्रणातून तेल सुटेपर्यंत चांगले शिजवून घ्या. यात हळद, लाल तिखट, गरम मसाला आणि मीठ घालून एकत्र करा. मसाला चांगला परतल्यावर त्यात १ कप पाणी घाला आणि उकळी येऊ द्या. ग्रेव्हीला उकळी आल्यावर त्यात तळून ठेवलेले काजू आणि फ्रेश क्रीम घाला. मंद आचेवर ४ ते ५ मिनिटे भाजी शिजवून घ्या. शेवटी वरून कसुरी मेथी हातावर चोळून घाला आणि बारीक चिरलेली कोथिंबीर पसरवा. तयार काजू करी गरम गरम नान, तंदुरी रोटी किंवा चपातीसोबत सर्व्ह करा.

## वास्तू

### फॅक्टरीसाठी

✼ गोडाऊन किंवा फॅक्टरीच्या मध्यभागी कोणतेही वजनदार सामान किंवा मशिन्स ठेवू नयेत.

✼ गोडाऊनमध्ये रॅक्स किंवा शेल्फ्स बनवताना ते दक्षिण किंवा पश्चिम भिंतीला टेकवून बनवावेत.

✼ मुख्य दाराजवळील सिक्युरिटी गार्डची केबिन आग्नेय किंवा वायव्य बाजूला असावी.

फॅक्टरीच्या आवारात उत्तर आणि पूर्व दिशेला जास्त मोकळी जागा सोडावी, तर दक्षिण आणि पश्चिम बाजूने जास्त बांधकाम असावे.

## सौंदर्य

रात्री त्वचा हायड्रेट राहणे खूप गरजेचे असते. त्यामुळे तुमच्या त्वचेला सुटेबल असे नाईट क्रीम किंवा मॉइश्चरायझर लावा. कोरड्या त्वचेसाठी हेवी क्रीम आणि तेलकट त्वचेसाठी लोवेरा जेल उत्तम ठरते.

## सल्ला

✼ कांदा परतताना त्यात चिमूटभर मीठ किंवा साखर घातल्यास तो लवकर मऊ होतो आणि छान गुलाबी होतो.

✼ कांदा, लसूण आदी कापल्यानंतर हाताला किंवा चॉपिंग बोर्डला येणारा वास घालवण्यासाठी लिंबाची साल किंवा बेकिंग सोडा चोळून धुवावे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट २०२६

**पतेती, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, श्रावण शुक्लपक्ष, पूर्वा २७।४३, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. १४ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** कामात प्रगती होऊन नवीन योजना आणि धनलाभासाठी अनुकूल दिवस आहे.

**वृषभ :** प्रवासात व व्यवहारात सावध राहा; कुटुंबातील गैरसमज दूर होतील.

**मिथुन :** नोकरी-व्यवसायात धनलाभाच्या नवीन संधी मिळेल.

**कर्क :** कामाचा ताण शांततेने हाताळा; अनावश्यक खर्च टाळणे हिताचे ठरेल.

**सिंह :** आत्मविश्वास वाढेल आणि जुन्या गुंतवणुकीतून चांगला फायदा होईल.

**कन्या :** नवीन जबाबदारी मिळेल; खर्चावर आणि वाणीवर संयम ठेवा.

**तूळ :** भाग्याची साथ लाभेल आणि नवीन कामात यश मिळेल.

**वृश्चिक :** वाद टाळून सावध राहा; जोडीदाराच्या साथीने मन प्रसन्न राहील.

**धनु :** प्रलंबित कामे पूर्ण होऊन आर्थिक लाभ होईल.

**मकर :** कामाचा ताण जाणवेल, पण कौटुंबिक सहकार्याने मनःशांती मिळेल.

**कुंभ :** कला आणि व्यवसायात यश मिळून आर्थिक स्थिती मजबूत होईल.

**मीन :** सुरुवातीची चिंता संध्याकाळपर्यंत दूर होऊन कुटुंबाचा पाठिंबा मिळेल.

## फिल्मीचक्कर क्र. १२४९ सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | २ | | ३ | | ४ |
| | ■ | ■ | | ■ | | ■ | |
| | ■ | ५ | ■ | ६ | ■ | ७ | |
| ८ | | | | | ९ | ■ | |
| | ■ | | ■ | ■ | | ■ | |
| | ■ | | ■ | १० | | ११ | |
| ■ | १२ | | | ■ | ■ | | ■ |
| ■ | ■ | | ■ | १३ | | | |

**आडवे शब्द :-** १) ++ +++ + दिल ए बेकरार (गाणे) ७) ++ कैसा है जनाब का क्या ख्याल है आप का (गाणे) ८) दिवंगत अभिनेता राजेंद्रकुमारचा अभिनेता मुलगा तथा 'लव स्टोरी' या चित्रपटाचा नायक १०) सुनील दत्त, नूतन यांचा गाजलेला व सर्वांगसुंदर गाण्यांनी सजलेला एक चित्रपट १२) राजेंद्रकुमार, बबिता, प्राण यांचा एक गाजलेला चित्रपट १३) अक्षयकुमार, करिना कपूर, बॉबी देओल, बिपाशा बसू यांचा एक चित्रपट

**उभे शब्द :-** १) दूरचित्रवाणीवरील एक निर्माता-दिग्दर्शक २) 'सावन भादो, एक ही भूल, मिस्टर नटवरलाल, खूबसूरत, उमरावजान' आदी चित्रपटांची नायिका ३) चल ++ चल मेरे साथी ओ मेरे हाथी (गाणे) ४) + ++++++ ऐ गुलबदन फूलोंकी (गाणे) ५) ++ ++ ++ या छोड दिया जाय बोल (गाणे) ६) मनोजकुमार, नंदा, जया भादुरी, प्रेमनाथ यांचा एक गाजलेला चित्रपट ९) प्राण जाय पर +++ न जाय (चित्रपटाचे नाव) ९) 'पळू किंवा पदर' या अर्थाचा शब्द

# ✼ ✼ ✼ ✼ ✼ ✼ मुलांचे विश्व ✼ ✼ ✼ ✼ ✼ ✼

**सुविचार :** यश हे प्रयत्नांशिवाय मिळत नाही, आणि प्रयत्न सतत केल्यास अपयश जास्त काळ टिकत नाही.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### मासे पाण्यात डोळे उघडे ठेवून कसे झोपतात?

पाण्यात जलद गतीने पोहणारे मासे निसर्गाचा एक अद्भुत चमत्कार आहेत. त्यांना जवळून पाहताना अनेकदा एक प्रश्न मनात नक्कीच येतो, तो म्हणजे मासे कधी झोपतात का? आणि जर झोपतात, तर मग त्यांचे डोळे नेहमी उघडे का असतात? यामागचे कारण अतिशय रंजक आणि शास्त्रीय आहे.

माणसांना आणि जमिनीवर राहणाऱ्या बहुतांश प्राण्यांना डोळ्यांवर पापण्या असतात. आपल्या डोळ्यांमध्ये धूळ किंवा कचरा जाऊ नये आणि डोळे कोरडे पडू नयेत म्हणून आपण सतत डोळ्यांची उघडझाप करत असतो. झोपताना आपण डोळे मिटतो कारण त्यामुळे डोळ्यांना विश्रांती मिळते आणि ते ओले राहतात. परंतु, माशांचे आयुष्य संपूर्णपणे पाण्यातच जात असल्याने त्यांचे डोळे निसर्गामुळे सतत ओलेच राहतात. त्यामुळे त्यांना डोळे मिटण्यासाठी किंवा कोरडे पडण्यापासून वाचवण्यासाठी माणसांसारख्या पापण्यांची अजिबात गरज नसते. माशांना पापण्याच नसल्यामुळे, ते जागे असताना असोत वा झोपलेले, त्यांचे डोळे नेहमी उघडेच दिसतात.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, माशांची झोपण्याची पद्धत माणसांपेक्षा पूर्णपणे वेगळी असते. माणूस जेव्हा झोपतो, तेव्हा तो आजूबाजूच्या जगापासून पूर्णपणे अनभिज्ञ होऊन गाढ झोपेत जातो. मासे मात्र अशी पूर्ण गाढ झोप घेत नाहीत. विश्रांती घेताना मासे पाण्याच्या तळाशी शांत बसतात, एखाद्या खडकाच्या किंवा वनस्पतींच्या मागे लपतात किंवा पाण्याच्या प्रवाहात एकाच जागी हळूवार तरंगत राहतात. या अवस्थेत त्यांच्या शरीराची हालचाल अत्यंत मंद होते आणि मेंदू विश्रांतीच्या स्थितीत जातो. ही त्यांची झोपण्याची किंवा सुस्तावण्याची पद्धत असते.

पाण्यामध्ये लहान माशांना मोठ्या शिकारी प्राण्यांपासून सतत धोका असतो. जर मासे माणसासारखे गाढ झोपले, तर ते सहजरीत्या इतर प्राण्यांचे भक्ष्य बनू शकतात. त्यामुळे निसर्गाने त्यांची रचना अशी केली आहे की, डोळे उघडे असल्यामुळे आजूबाजूला होणारी थोडी जरी हालचाल, पाण्याचा बदलणारा प्रवाह किंवा प्रकाशातील बदल त्यांना लगेच जाणवतो. धोका दिसताच मासे क्षणाचाही विलंब न लावता लगेच पोहून दूर निघून जाऊ शकतात.

थोडक्यात सांगायचे तर, माशांना पापण्या नसल्यामुळे ते डोळे मिटू शकत नाहीत आणि त्यांची झोप ही गाढ झोप नसून शरीराला दिलेली एक हलकी विश्रांती असते. याच शास्त्रीय कारणामुळे मासे नेहमी पाण्यात डोळे उघडे ठेवूनच विश्रांती घेताना किंवा झोपताना दिसतात.

### संयमाची ताकद

एका सुंदर गावात 'माधवराव' नावाचे एक अनुभवी आणि ज्ञानी शिल्पकार राहत होते. ते मातीचे आणि पाषाणाचे सुंदर पुतळे बनवण्यात पटाईत होते. त्यांच्या हाताला एक वेगळीच जादू होती.

एकदा माधवरावांकडे एका मोठ्या मंदिरासाठी एक अत्यंत सुंदर आणि मोठा दगडी पुतळा बनवण्याचे काम आले. त्यांना त्यासाठी एक महिन्याची मुदत देण्यात आली होती. माधवरावांनी कामाला सुरुवात केली. त्यांनी एक मोठा दगड निवडला आणि त्यावर छन्नी आणि हातोडीने घाव घालण्यास सुरुवात केली.

आठवडाभर काम केल्यावर त्या दगडाला सुंदर आकार येऊ लागला. पण, काम करताना माधवरावांच्या लक्षात आले की, दगडाच्या अगदी मधोमध एक अत्यंत कठीण शिळा (गाठ) आहे. जर तिथे जोरात हातोडी मारली, तर संपूर्ण दगड चुरगळून तुटण्याची दाट शक्यता होती.

माधवरावांचा तरुण आणि उत्साही शिष्य तिथे उभा होता. तो म्हणाला, गुरुजी, हा दगड फार त्रास देतोय. आपण यावर खूप जोरजोरात घाव घातले पाहिजेत, तरच हा लवकरात लवकर आकाराला येईल. आपल्याकडे वेळ कमी आहे!

माधवराव थोडे हसले आणि म्हणाले, बाळा, शिल्पकलेमध्ये घाई करून चालत नाही. घाई केली तर सुंदर पुतळा बनण्याऐवजी दगडाचा केवळ चुरा होईल. कला ही संमयाने आणि संयमानेच फुलते.

पण शिष्याला गुरुंचे म्हणणे पटले नाही. त्याला वाटले की गुरुजी निष्कारण वेळ वाया घालवत आहेत. दुसऱ्या दिवशी माधवराव विश्रांतीसाठी बाहेर गेले असता, शिष्याने स्वतःच ती मोठी हातोडी हातात घेतली आणि त्या कठीण गाठीवर अत्यंत रागारागात आणि जोरात एक मोठा घाव घातला.

परिणाम असा झाला की, त्या एकाच चुकीच्या आणि घाईगडबडीत मारलेल्या घावामुळे तो संपूर्ण सुंदर दगड मधोमध तडकला आणि त्याचे तुकडे-तुकडे झाले. शिष्याचे डोळे खाडकन उघडले आणि त्याला आपल्या चुकीची जाणीव झाली. तो रडतच माधवरावांसमोर येऊन उभा राहिला आणि म्हणाला, गुरुजी, माझ्या घाईमुळे आणि असंयमामुळे आपले सगळे श्रम वाया गेले.

माधवरावांनी त्याला जवळ घेतले आणि प्रेमाने समजावत म्हणाले,

बाळा, घाईगडबडीने घेतलेले निर्णय आणि रागाच्या भरात मारलेले घाव कायम विनाशच करतात. आयुष्यात मोठे यश मिळवण्यासाठी केवळ मेहनत पुरेशी नसते, तर तिथे संयम, चिकाटी आणि योग्य वेळेची प्रतीक्षा करावी लागते.

बोध : घाईत घेतलेले निर्णय आणि राग किंवा चंचलतेने केलेली कामे शेवटी नुकसानच करतात.

## आत्मशक्ति



### भुतदया

पायथागोरसने आपल्या शिष्यांना सांगितले की त्यांना स्वतःचे शरीर मांसाहाराने खराब करावयाचे नाही. ते म्हणत, आपल्याला पर्याप्त अन्न उपलब्ध आहे. फळे व भाजीपाला असून ते आम्ही सहज शिजवू शकतो. तसेच दूध व मधही उपलब्ध आहे. ते म्हणत ह्या पृथ्वीतीलावर पवित्र आणि लाभदायक असे अन्न असताना खाण्याकरीता आम्ही कुणाचे रक्त सांडविण्याची किंवा कुणाला मारण्याची काय गरज आहे ?

प्रसिद्ध शास्त्रज्ञ सर आयझॅक न्यूटन, राजा अकबर, परसी बिश शैली, लियो टॉलस्टॉय, लियोनार्डो-द-व्हिन्सी, एलबर्ट आईनस्टाईन, जॉर्ज बर्नार्ड शॉ आणि महात्मा गांधी इत्यादी प्रख्यात मोठमोठ्या विभूति शाकाहारीच होत्या.जागृत आत्म्याच्या मार्गदर्शनाखाली आपले जीवन जगवयास सुरुवात केल्यावर मांस खाणे केवळ कठीणच नव्हे तर अशक्यप्राय होते. प्राणीमात्रांशी आपल्या छोट्या बहिण-भावांशी असलेल्या संबंधासारखा अनुभव होतो. असा अनुभव असीच्या संत फ्रान्सिस ह्यांना झाला होता. महान सूफीसंत राबिया बसरी ह्यांनी परमेश्वराच्या संपूर्ण सृष्टीशी स्वत: जोडले गेल्याचा अनुभव घेतला होता. एक दिवस त्या डोंगरावर गेल्या असतांना स्वत:ला वन्य प्राण्यांकडून घेरले गेल्याचे पाहिले. त्यावेळी तेथे हसन-अल-बसरी गेले असतांना ते सर्व प्राणी घाबरून पळून गेल्याचे दिसले. त्यामुळे ते दु:खी झाले. त्यांनी राबिया बसरींना विचारले, 'आतापर्यंत हे वन्यप्राणी आपणाभोवती प्रेमाने उभे होते. पण मला पाहिल्यावर घाबरून ते कां बरे पळून गेलेत ?' राबियांनी विचारले, आज आपण काय खाल्ले ? त्यांनी सांगितले, कांद्याबरोबर भाजले मांस खाल्ले. त्यावर राबियांनी सांगितले, तुम्ही त्यांचे मांस खाता, तर मग तुम्हाला पाहिल्यावर ते पळणारच !चैतन्यमय आत्मा जीवनाच्या सर्व रुपांचा आदर करतो. आपण अंतरी डोकावून पाहिले तर आपणांस सहज दिसेल की, आपले हृदय सर्व प्राण्यांशी जोडले गेले आहे व ते प्रगत झाले आहे. आपल्या वसुंधरेशी संपर्क साधा दरवर्षी लाखो एकर जंगल जाळले जाते. ह्या जंगलात शेत बनविण्यासाठी, आपल्या फायद्यासाठी जीवन जगविणाऱ्या वृक्षांना जाळले जाते. (क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### संस्कार

बाळाच्या सुरुवातीच्या वर्षांमध्ये तयार झालेले संस्कार बदलणं नंतर खूप अवघड जातं. बाळाला स्वत:चा अहंकार नसतो त्यामुळे सुरुवातीच्या काही वर्षांत त्यांचे संस्कार बदलणं आणि त्यांना आकार देणं खूप सोपं आहे.असंही होऊ शकतं, की काही मुलं स्वभावाने खूप शांत असतात, पण नवीन वातावरणात ते ज्या प्रकारची ऊर्जा ग्रहण करतात ती खूपच अस्वस्थ करणारी, संघर्षाची आणि गडबड-गोंधळाची असते. अशा वेळी त्यांचे संस्कार वाईटाच्या दिशेने बदलतात. म्हणूनच पालकांनी त्यांच्या मुलांना चांगले संस्कार देणं ही त्यांची जबाबदारी आहे. आपण असा विचार करतो की, चांगले संस्कार देणं म्हणजे बोलायचं कसं, वागायचं कसं, प्रामाणिकपणा, इ. गोष्टी शिकवणं. पालकांचे संस्कार आणि त्यांची विचारपद्धती मुलांवर थेट परिणाम करते. कोणालाही संस्कार देण्याचा हा खूप तरल किंवा सहज लक्षात न येणारा मार्ग आहे.

प्रत्येक आत्म्याकडे पाच प्रकारचे संस्कार असतात. पहिला – पूर्वजन्मातून आलेले संस्कार. हा खूपच परिणामकारक घटक आहे. दुसरा – वर्तमान परिस्थितीत मिळणारे संस्कार. यात आनुवंशिक घटक येतात. त्याचबरोबर त्यांच्या कुटुंबाकडून आणि अन्य नातेवाईकांकडून मिळणारे संस्कारही येतात. तिसरा – शाळा, धर्म, देश, इ.माध्यमांद्वारे समाजाकडून मिळणारे संस्कार. चौथा – स्वत:च्या संकल्पशक्तीद्वारे त्याने स्वत: निर्माण केलेले संस्कार. या संबंधीच आपण या मालिकेत जाणून घेत आहोत – आपले जुने नकारात्मक संस्कार सोडून देऊन नवीन सकारात्मक संस्कार स्वत:च्या इच्छेने आणि निश्चयाने निर्माण करणं. (क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

गण्या : अरे, काल आमच्या गल्लीत वीज गेली होती,
मी टॉर्च घेऊन पूर्ण गल्लीत फिरलो.
बंड्या : मग काय झालं?
गण्या : काय होणार? लाईटच नव्हती, त्यामुळे कोणाचाच चेहरा दिसला नाही!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✼ १९३२ चा 'पुणे करार' कोणामध्ये झाला?
– महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आहारवेद – आरोग्य संवर्धन

### बाजरी

आधुनिक शास्त्रानुसार : बाजरीमध्ये चुनखडी, लोह, प्रथिने, स्निग्धता, तंतुमय पदार्थ व खनिजे ही सर्व पौष्टिक, आरोग्यास गुणकारी अशी घटकद्रव्ये असतात.

उपयोग : १) शेतामध्ये बाजरीची हिरवी कणसे भाजून त्याचा हुरडा तयार करून गरमागरम असतानाच गुळासोबत व ठेच्यासोबत खावा. हा हुरडा अतिशय चविष्ट व उत्साहवर्धक असून आरोग्यास गुणकारी असतो.

२) बाजरीच्या दाण्याच्या लाह्या करून खाव्यात. ज्यांच्या तोंडाला रुची नाही, तसेच अपचन, भूक न लागणे अशा विकारांवर या लाह्या गुणकारी असतात.

३) पावसाळ्यात व हिवाळ्यात बाजरीची गरम भाकरी तूप किंवा लोणी लावून खावी. ही भाकरी लहान मुलांचे आरोग्य सुदृढ राहण्यासाठी व त्यांची निकोप वाढ होण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे.

४) शारीरिक श्रम जास्त असणाऱ्या कष्टकरी लोकांनी, शरीर शक्तिशाली बनविण्यासाठी बाजरीची भाकरी गायीच्या/म्हशीच्या दुधात कुस्करून खावी.

५) बाजरीची भाकरी कुस्करून त्यात गूळ व साजूक तूप घालून त्याचे लाडू बनवून खाल्ले असता शरीरास बळ मिळते.

६) बाजरीची भाकरी ताकाबरोबर किंवा कढीबरोबर खाल्ल्यास अधिक रुचकर लागते व ती शरीरासाठी उत्साहवर्धक ठरते.

७) प्रसूतीनंतर बाळंतिणीने आहारामध्ये बाजरीची भाकरी खाल्ल्यास तिला भरपूर दूध येते व त्यासोबत गर्भाशयाचे आकुंचन होण्यास मदत होते.

८) बाजरीपासून भाकरीव्यतिरिक्त खिचडी, वडे, थालीपीठ, पापड्या, चकोल्या असे विविध स्वादिष्ट व रुचकर पदार्थ बनविता येतात.

९) बाळंतिणीला दूध भरपूर येण्यासाठी व गर्भाशयाचे आकुंचन होण्यासाठी बाजरीची पेज गायीचे तूप व गूळ घालून गरम गरम प्यायला द्यावी.

सावधानता : बाजरी ही उष्ण वीर्यात्मक असल्यामुळे तिचे उन्हाळ्यात सेवन करू नये. तसेच पित्तप्रकृतीच्या व्यक्तींनी व उष्णतेचा त्रास असणाऱ्या व्यक्तींनी सेवन करू नये. त्याचबरोबर मूळव्याधीचा त्रास असणाऱ्या रुग्णांनी व मलावष्टंभाचा त्रास असणाऱ्या रुग्णांनी बाजरीची भाकरी सेवन करू नये. बाजरीची भाकरी फक्त पावसाळा व हिवाळ्यात गायीचे तूप/लोणी टाकून सेवन केल्यास ती आरोग्याला बाधत नाही.

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
'मोबाईल नं– ८७९३४००४००

# आनंदधाम परिसरात आचार्यश्रींच्या जन्मोत्सवाचा उत्साह

## ३६०० हून अधिक तपस्वींचे गुरूदेवांचरणी अट्ठाई उपवास

नगर – अहिल्यानगरमधील आनंदधाम परिसरात सुरू असलेल्या उपाध्यायश्री पूज्य प्रविणऋषीजी म.सा. यांच्या समर्पण चातुर्मासात १३ ऑगस्ट रोजी सकाळी राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांची १२७ वी जन्म जयंती भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. गुरूभक्तीच्या या पावन महापर्वात नगरसह देशभरातून आलेले भक्त सहभागी झाले होते. गुरू गुणानुवाद तसेच आचार्यश्रींच्या जन्मोत्सवानिमित्त उपवास करणाऱ्या ३६०० हून अधिक तपस्वींचे अट्ठाई प्रत्याख्यान झाले.



आनंदधाम आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त उपस्थित तपस्वी व भाविक.

आचार्यश्रींचा जन्मोत्सव महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषीजी म.सा. पूज्य मुनीश्री हितप्रेम विजयजी महाराज, पूज्य आलोकऋषीजी म.सा., पूज्य तिर्थेशऋषीजी म.सा., महासतीजी पूज्य सत्यप्रभाजी म.सा., महासतीजी पूज्य अमितज्योतीजी म.सा., आदी साधूसाध्वीजींच्या सान्निध्यात झाला. याप्रसंगी चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी अहिल्यानगरचे सुपुत्र, मुंबईचे सुप्रसिद्ध उद्योगपती तसेच तिरुपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ बोरा, धार्मिक परीक्षा बोर्डचे अध्यक्ष नेमीचंद चोपडा, जैन कॉन्फरन्सचे राष्ट्रीय चेअरमन रमेश भंडारी, महामंत्री अमितराय जैन, जितोचे राष्ट्रीय अध्यक्ष विजय भंडारी, गुरू आनंद फाउंडेशनचे चेअरमन सतीश सुराणा, चेन्नई येथील अर्हम विज्ञाचे संस्थापक कांताबाई चोरडिया, गौतम कांकरिया, सौ. राखी सौरभ बोरा, प्रमिलाबाई हेमराजजी बोरा, पराग बोरा व बोरा परिवार, समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी व कमिटीचे सदस्य, सौरभ बोरा मित्र परिवार सदस्य उपस्थित होते. आचार्यश्रींच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी नगर, महाराष्ट्रासह बंगलोर, चेन्नई, राजस्थान, मध्यप्रदेश, कर्नाटक यासह देशातील विविध राज्यांतील भाविक उपस्थित होते. आचार्यश्रींच्या समाधीस्थळी सकाळपासूनच दर्शनासाठी मोठी गर्दी झाली होती. जय गुरु आनंदचा जयघोष परिसरात निनादला.

पूज्य प्रविणऋषीजी महाराज म्हणाले की, सतरा वर्षांनंतर गुरूदेवांच्या भूमीत चातुर्मास करायला मिळत आहे. खरं तर हा सतरा वर्षांचा कालावधी माझ्यासाठी वनवास होता. जीवनातील एक चातुर्मास गुरूदेवांच्या चरणी व्हावा ही माझी इच्छा होती. समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा व सर्व ट्रस्टींनी अतिशय सुंदर नियोजन केले आहे. आज याठिकाणी प्रत्येकाच्या हृदयात मला पूज्य गुरूदेवांचे दर्शन होत आहे. १२७ वर्षांपूर्वी महाराष्ट्रात मोजकेच साधू साध्वी होते. तरीही माता हुलसा यांनी आपल्या मुलाचे नाव तीर्थंकरांच्या नावानुसार ठेवले. तेच नेमिचंद आज आनंदऋषीजी म्हणून आपल्या हृदय सिंहासनावर विराजमान आहेत. पूज्य रत्नऋषीजी महाराजांनी अशी मूर्ती घडवली की गुरूदेव कायम लोकांच्या हृदयात वसलेत. मोठ्या संख्येने अट्ठाई उपवास करणाऱ्या तपस्वींना फक्त आणि फक्त गुरूदेवांचीच आठवण आली असेल. आज येथील प्रत्येकाने संकल्प करावा की, आपल्या आसपास संप्रदायाची दुही पसरवू देणार नाही. धर्म तुम्हाला जोडतो, संप्रदाय तुम्हाला तोडतो. आपला संघ एक राहील असा दृढ निश्चय करा. गावागावात दर गुरुवारी आनंद चालिसा पाठ सुरू करा.

पूज्य कुंदन ऋषीजी महाराज म्हणाले की, आचार्य भगवंतांचे जीवन खुले पुस्तक होते. प्रत्येक पानावर त्यांनी समाजाला चांगल्या गोष्टी दिल्या. त्यांचे आदर्श जीवन सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी पाठशाळा सुरू केल्या. पुढे देशभरात अनेक शैक्षणिक संस्था निर्माण झाल्या. त्यांनी समाजातील उपेक्षित घटकांना ऊर्जितावस्था देण्यासाठी अनेक आर्थिक संस्था सुरू केल्या. यातून अनेकांना आजही मदत मिळत आहे. समाजाला संघटित करण्यासाठी त्यांनी राजस्थान, पंजाब, जम्मू पर्यंत विहार केला. अशा महापुरुषांचा आज जन्मोत्सव आहे. यानिमित्त ३६०० हून अधिक तपस्वींनी उपवास केले. ही गुरूदेवांवरील खरी श्रद्धाच आहे.

पूज्य मुनीश्री हितप्रेम विजयजी महाराज. म्हणाले की, आपण मुलांना योग्य वयात शिकवले पाहिजे. माता हुलसा यांनी हेच काम केले आणि ऋषी आनंद आपल्याला मिळाले. आपल्या अंतर्मनात धर्माचा वास हवा. आचार्यश्रीजींनी विनम्र राहून सर्व धर्म ग्रंथांचा सखोल अभ्यास केला. संप्रदाय एक केला. आचार्यश्रींच्या कर्मभूमीत जन्मोत्सवाला उपस्थित राहताना खूप आनंद होत आहे. सौरभ बोरा म्हणाले, हा चातुर्मास ऐतिहासिक ठरत आहे. चातुर्मास समितीबरोबरच माझा मित्र परिवार या सोहळ्यासाठी रात्रंदिवस परिश्रम घेत आहे व चातुर्मास पूर्ण होईपर्यंत सर्वांचा उत्साह असाच कायम राहील असा विश्वास आहे.

प्रास्ताविकात अशोक बोरा म्हणाले की, सतरा वर्षांनंतर उपाध्यायश्रींचा चातुर्मास होत आहे हे अहिल्यानगरचे भाग्य आहे. समर्पण चातुर्मासासाठी सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. मुख्य लाभार्थी सौरभ प्रमिलाबाई हेमराजजी बोरा यांनी समर्पित भावनेने योगदान दिले आहे. अहिल्या नगरमध्ये आचार्य भगवंतांनंतर प्रथमच इतका मोठा चातुर्मास होत आहे याचा गौरव वाटतो. तपस्यांचा मोठा वर्षाव यावेळी झाला आहे.

स्वागत करताना आदेश चंगेडिया म्हणाले, आज याठिकाणी आचार्यश्रींचा जन्मोत्सव साजरा होत आहे. यानिमित्त ३६०० हून अधिक तपस्वींनी उपवास केला आहे. गुरूदेवांच्या या कर्मभूमीत वातावरण खूप सकारात्मक व ऊर्जादायी झाले आहे. अनिल पोखरणा म्हणाले, गुरूदेवांच्या जन्मोत्सवानिमित्त प्रचंड मोठ्या संख्येने भाविकांनी अट्ठाई उपवास केले आहेत. हा सर्वोच आनंदाचा क्षण आहे. सर्व तपस्वींना समितीकडून धन्यवाद देतो. विलास कटारिया म्हणाले, नगरमधील हा चातुर्मास सर्वांची स्वप्नपूर्ती करणारा आहे. चातुर्मास प्रत्येकाला नवीन ज्ञान देणारा ठरेल यात शंका नाही. प्रसाद बेडेकर यांनी सूत्रसंचालन केले. शेवटी आचार्यश्रींच्या ध्वनीमुद्रीत मंगल पाठाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# प्रेरणादायी अक्षरधन

## मन जहरी जहरी

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन: दिशान फिचर्स




माणसा, अजबच तुझी विचारधारा। हरकत नसते तुझी, घरात घाण असायला? फक्त काळजी घ्यायची, की ती नको दुसऱ्याला दिसायला. हे नाही कळत त्याला, की झाकलेली घाण बांधणार आहे शेवटी मलाच। लगेच स्वच्छ व्हावं म्हणून काढून फेकावं दुर तिला। नको थारा काडी कचऱ्याला। मनात नकोत पुसटसेही विकृत विचार उरायला. दुष्टपणे वागणं हिंस्त्र प्राण्यांना शोभणे। माणसांची तर ती दुषणे. महाभारताचे वचन नेहमी आठवणे.

क्रोर्य आणि हिंसा हा हिंस्त्र पशुंचा धर्म धर्म. विवेकी माणसाचा तो अधर्म. तेव्हा क्रूर आणि हिंसक कर्म न करणं, हेच माणसाच्या सुखसमृद्धीचं मर्म. सुज्ञ माणसा, दुष्टविचार व दुष्प्रवृत्ती टाळ. मानव धर्म पाळ. भांडणतंटे व अशांतता यांना आळा. ते न कुणाच्याही हिताचे हे जाणा. माणसानं माणसालाच का आणावा कमीपणा?

पंडित विष्णुशर्म्यानं ही कहाणी सांगितलीय. एक दरिद्री माणूस प्रवास करीत होता. वाटेत जंगल लागलं. एक खोल मोठी विहीर बाजूला होती. तो माणूस विहिरीजवळ आला. त्याला पाहताच विहिरीतून आवाज झाला. अहो, मला मदत करा, बाहेर काढा.

माणूस आत डोकायला आता होते चौघे। वाघ, वानर, साप आणि माणूस, वाघ म्हणाला, मी तुला खाणार नाही. उलट तुला हवी ती मदत देईन. पण मला वर काढ. वानर आणि माणूस देखील तसंच म्हणाले. त्या दरिद्री प्रवाशानं त्या चौघांनाही बाहेर काढलं.

वानर जवळच्याच झाडावर चढलं. त्या प्रवाशाला भूक लागली असेल, हे जाणून त्या वानरानं त्याला झाडावरची मधूर फळं दिली. मग तो प्रवासी वाघाकडं गेल. वाघानं त्याचं स्वागत केलं. दरिद्री प्रवाशानं काही धन मिळावं म्हणून इच्छा व्यक्त केली. वाघान त्याला हिऱ्यांचा कंठा आणि इतर सोन्याचे अलंकार दिले.

हे अलंकार विकून पैसा मिळवू. या प्रवाशाला लगेच तो विहिरीतून काढलेला माणूस आठवला. तो सोनारच होता. त्या सोनाराकडं हा प्रवासी, वाघानं दिलेलं अलंकार घेउन गेला. हे विकायचे आहे, मला पैसे हवे आहेत, म्हणाला तो सोनार अलंकार पाहून चकितच झाला.

सोनारानं त्या दरिद्री माणसाला थांबायला सांगितलं आणि ते दागिने घेउन तो सरळ राजाकडं गेला म्हणाला, हे पाहा अलंकार. मी आपल्या हरवलेल्या राजपुत्रासाठी तयार केले होते. राजपुत्राला पळविणारा व ठार करणारा हाच आहे.

राजा संतापला. त्या दरिद्री प्रवाशाला त्यानं पकडलं व कारागृहात डांबलं. राजपुत्राच खुनी म्हणून त्याला फाशी द्यायचं ठरवलं. त्या दरिद्री प्रवाशाला वाईट वाटलं. ज्याचे मी प्राण वाचवले तो माणूसच आता माझ्या जिवावर उठला आहे. खोटा वृत्तांत रचून ? या नरापेक्षा तो वानर बरा, तो वाघ बरा। त्याला काही सुचेना. मग त्याला त्या विषारी सापाची आठवण झाली त्यानं त्या सापाची प्रार्थना केली. साप हजर झाला. सापाला त्या सोनाराचा राग आला. सोनाराला मारणं सोपं पण उपकारकर्त्याचा जीव वाचवायचा कसा, हा सापाला प्रश्न पडला. त्याला युक्ती सुचली.

त्या रात्रीच राणीला विषारी साप चावला. राणीची हालचाल मंदावत गेली. राजा घाबरला. जो कुणी राणीला वाचवेल, त्याला वाटेल ते इनाम मिळेल. असं त्यानं जाहीर केलं. या विषारी सापानं युक्ती सांगितलेली होती. प्रवाशानं कारागृहातून राजाला निरोप पाठवला की मी राणीला वाचवतो. त्या दरिद्री माणसानं मग राणीच्या डोक्याला हात लावला. आणि विष उतरलं। राजानं त्या दरिद्री माणसाचे पाय धरले। त्याला मुक्त केलं. प्रचंड धन दिलं. त्या दरिद्री माणसाची संपूर्ण कहाणी ऐकली.

– किशोर गांधी

# 'अहिल्यानगर फॅशन रनवे'साठी १५ ऑगस्ट रोजी मेगा ऑडिशन; अहिल्यादेवींच्या लेकींना सहभागासाठी आणखी एक सुवर्णसंधी

नगर – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या देदीप्यमान इतिहासाचा वारसा लाभलेले अहिल्यानगर सांस्कृतिक, अध्यात्मिक दृष्ट्या समृद्ध परंपरा जपणारे आहे. अहिल्यादेवींचा आदर्श समोर ठेवून विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या महिलाही शहराची शान आहेत. याच स्त्री शक्तीला स्वतःमधील सुप्त गुण जगासमोर आणण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळावे शहराच्या सांस्कृतिक वैभवात भर पडावी यासाठी नगरमध्ये अहिल्या सरस्वती महोत्सव साजरा होत आहे. यात अहिल्यानगर फॅशन रनवे २०२६ आयोजित करण्यात आला आहे. पहिल्या ऑडिशनला मिळालेल्या प्रचंड प्रतिसाद आणि अहिल्यादेवींच्या आधुनिक काळातील लेकीचा आग्रह लक्षात घेऊन १५ ऑगस्ट रोजी आणखी एका ऑडिशनचे आयोजन करण्यात आले आहे. नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉन्स येथे सकाळी ९ ते सायंकाळी ५ यावेळेत हे ऑडिशन्स होणार आहे, अशी माहिती सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक स्त्री रोग तज्ज्ञ डॉ.अमोल जाधव यांनी दिली.

अहिल्यानगर फॅशन रनवे २०२६ सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या पुढाकाराने होत असून मुख्य प्रायोजक महावीर ग्रुप (राजेश भंडारी) आहे. देशातील फॅशन विश्वातील अग्रगण्य फॅशन प्लॅटफॉर्म 'फॅशन कार्निव्हल'च्या माध्यमातून, ज्यांची मूळ संस्था कल्लाकार फॅक्टरीद्वारे हा महोत्सव संकल्पित व साकार करण्यात येत आहे. ९ ऑगस्ट रोजी झालेल्या पहिल्या ऑडिशनला संधी न मिळालेल्या युवती, महिलांना १५ ऑगस्टला दुसऱ्या ऑडिशनमध्ये सहभागी होता येणार आहे. पॅरेंट अँण्ड मी वॉक, डॉक्टर्स वॉक, डिझायनर फॅशन रनवे (पारंपरिक व वेस्टर्न) आणि ८ वेगवेगळे रनवे सिक्वेन्स यात असतील. गर्भवती मातांसाठी ऑडिशन्स नसून त्यांना ९७३०२०८०९८ या मोबाईल क्रमांकावर थेट नोंदणी करता येईल. नवोदितांसाठी हा फॅशन रनवे मोठी संधी असून एक मोठे व्यासपीठ त्यांना नगरमध्येच मिळणार आहे. सहभागींना पोशाख, मेकअप, दागिने आणि प्रशिक्षणाची सुविधाही उपलब्ध आहे.

अहिल्यानगर फॅशन रनवे मध्ये १६ वर्षांपुढील मुली, महिला सहभागी होऊ शकतील. फॅशन रनवेचा मुख्य इव्हेंट रविवार, ३० ऑगस्ट रोजी नवीन टिळक रोडवरील पराडाईज हॉटेल मागील नंदनवन लॉन्स येथे होईल. यात फॅशन रनवे बरोबरच अहिल्या गौरव पुरस्कार, सरस्वती गौरव पुरस्कार वितरण, प्रेग्नेंट लेडी वॉक, डॉक्टर्स वॉक, पॅरेंट ण्ड मी वॉक, डिझायनर फॅशन सिक्वेन्स होईल. याशिवाय महिला सक्षमीकरणावर आधारित नृत्य नाट्य आविष्कार सादर केला जाणार आहे. टॅलेंट, फॅशन, सक्षमीकरण, आरोग्य, मनोरंजन आणि पुरस्कार असा सुरेख संगम असलेला हा महोत्सव मोठी पर्वणी ठरणार आहे. महोत्सवातील सर्व कार्यक्रमांना मोफत प्रवेश आणि सहभाग आहे. युवती, महिलांनी यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# सीए विद्यार्थी अबुजर शेख यांच्या लक्ष्यची जागतिक विक्रमांची नोंद




नगर – सीए अंतिम वर्षातील परीक्षार्थी तसेच वेस्टर्न इंडिया चार्टर्ड अकाउंटंट्स स्टुडंट्स असोसिएशन, अहिल्यानगरचे माजी सचिव अबुजर समीर शेख यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या लक्ष्य या ई–वार्तापत्राची वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद झाली आहे. लक्ष्यला इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाचे (आयसीएआय) पहिले आंतरराष्ट्रीय प्रकाशन तसेच पहिले संरक्षणविषयक वार्तापत्र म्हणून मान्यता मिळाली आहे.

अबुजर शेख यांनी या उपक्रमाचे एकमेव निर्माते आणि मुख्य संपादक म्हणून १२ महिन्यांत १२ वेगवेगळ्या संकल्पनांवर आधारित अंक साकारले. देशभक्ती, एकरंगी रेखाचित्रे, सण–उत्सव, उद्योग, संरक्षण आणि पडल्यानंतर पुन्हा उभे राहणे अशा विविध विषयांचा या अंकांमध्ये समावेश होता. प्रत्येक अंकातून सर्जनशीलता, सामाजिक बांधिलकी आणि विद्यार्थ्यांच्या विविधांगी कलागुणांना व्यासपीठ देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

लक्ष्यच्या संरक्षण विशेषांकामध्ये भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलाच्या कार्याची माहिती देणारे लेख, भारताचे माजी राष्ट्रपती व ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना समर्पित लेखमाला, निवृत्त कर्नल डी. एच. परब यांची मुलाखत तसेच संरक्षण क्षेत्र आणि सनदी लेखापाल व्यवसाय यांच्यातील संबंध यांसारख्या विषयांचा समावेश करण्यात आला. या विशेषांकाच्या निर्मितीत श्रीलंकेतील सीए विद्यार्थ्यांचाही सहभाग होता.

लक्ष्यच्या या यशाबद्दल अबुजर समीर शेख म्हणाले, लक्ष्य ही केवळ एक कल्पना नव्हती, तर कल्पनांना प्रत्यक्ष रूप देण्याचा प्रयत्न होता. या प्रवासात ॲड. गफ्फार शेख, अभियंता आसिम शेख आणि प्रा. अरबाज पठाण यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच सीए प्रसाद पुराणिक आणि सीए अभयकुमार कटारिया यांनी माझ्या कल्पनांवर विश्वास ठेवून मला सर्जनशील स्वातंत्र्य दिले. त्यांच्या पाठिंब्यामुळे लक्ष्यला वेगळी ओळख निर्माण करता आली. विद्यार्थीदशेत असतानाच सर्जनशील लेखन, संपादन आणि विविध विषयांवरील मांडणीच्या माध्यमातून वेगळा उपक्रम उभारणाऱ्या अबुजर शेख यांच्या लक्ष्यची जागतिक तसेच राष्ट्रीय विक्रम म्हणून नोंद झाल्याने अहिल्यानगरच्या शैक्षणिक आणि सर्जनशील क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# २२ वर्षांच्या सैन्यसेवेनंतर मायभूमीत वीरपुत्राचे जंगी स्वागत

## खारेकर्जुने येथे ढोल–ताशांच्या गजरात मिरवणूक; आजी–माजी सैनिकांसह ग्रामस्थांची उपस्थिती



२२ वर्षे देशसेवा बजावून सेवापूर्ती झाल्यानंतर नायब सुभेदार अमोल पळसकर यांचे खारे कर्जुने येथे स्वागत करताना मान्यवर.

नगर – भारतीय सेनेच्या सप्लाय कोअरमध्ये तब्बल २२ वर्षे देशसेवा बजावून सेवापूर्ती झाल्यानंतर नायब सुभेदार अमोल पळसकर यांचे त्यांच्या मूळ गावी खारेकर्जुने (ता. नगर) येथे जल्लोषात स्वागत करण्यात आले. पंचक्रोशीतील शेकडो आजी–माजी सैनिक, वीरपिता, वीरनारी आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत त्यांचा सेवापूर्ती सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

ढोल–ताशांचा गजर, डीजेवरील देशभक्तीपर गीतांचा निनाद आणि फटाक्यांची आतषबाजी अशा उत्साही वातावरणात अमोल पळसकर यांची जीपमधून गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. गावातील रस्त्यांवर सडा–रांगोळी काढून ग्रामस्थांनी आपल्या वीरपुत्राचे उत्स्फूर्त स्वागत केले.

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य प्रताप पाटील शेळके यांनी मनोगत व्यक्त करताना, सैनिक सेवेत असताना त्याचा मोठा सन्मान केला जातो मात्र सेवेतून निवृत्त झाल्यानंतर खरी कसरत सुरू होते. सैनिकांना घरापासून गावापर्यंत विविध अडचणींना सामोरे जावे लागते. विशेषत सैनिकांच्या शेतजमिनींबाबत अनेक प्रश्न निर्माण होतात. अनेकदा आपलेच लोक त्रास देतात. अशा परिस्थितीत सैनिकांचे संघटन मजबूत असणे अत्यंत महत्त्वाचे आहे असे सांगितले.

कार्यक्रमास जिल्हा बँक संचालक रावसाहेब पाटील शेळके, आंबेजोगाईचे पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे, आरोग्य अधिकारी संतोष कराळे, त्रिदल सैनिक संघ अहिल्यानगरचे अध्यक्ष संजय म्हस्के, जिल्हा सैनिक कृती समिती श्रीगोंदाचे कॅप्टन राजेंद्र दारकुंडे, जयहिंद माजी सैनिक संस्थेचे अध्यक्ष मेजर निळकंठ उल्हारे, श्रीगोंदा तालुका भूमापन अधिकारी अविनाश ठोकळ, पोलीस अंमलदार मनोज खैरे, प्रताप तोडमल, ग्राम महसूल अधिकारी अरुण देवकर, वीरनारी संगीता कातोरे, भावनाताई शिंदे, नारायण झिने आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांनी अमोल पळसकर यांच्या देशसेवेचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ९४ वर्षीय मेजर नाना निमसे यांनी भूषविले.

यावेळी अवंती उद्योग समूहाचे अनिल भिंगारे, त्रिदल सैनिक संघ निंबळकचे अध्यक्ष एकनाथ आडसरे, खजिनदार मारुती ताकपेरे, बापू तांबे मेजर, विजय पठारे मेजर, संपत गायकवाड, विठ्ठल नरवडे, रावसाहेब कळमकर, कॅप्टन संपत निमसे, यांच्यासह पंचक्रोशीतील आजी–माजी सैनिक व ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नियोजन अमोल पळसकर यांचे बंधू विकास पळसकर, राहुल पळसकर, किरण पळसकर, महेश पळसकर, निलेश पळसकर, शरद पळसकर व अक्षय पळसकर यांनी केले.

शेवटी नायब सुभेदार अमोल पळसकर यांनी उपस्थित सर्व मान्यवर, सैनिक, ग्रामस्थ आणि आयोजकांचे आभार मानले.

# ऑक्टोंबर महिन्यात दिग्गज वक्त्यांच्या उपस्थितीत पंडित दीनदयाळ व्याख्यानमाला


पंडित दीनदयाळ व्याख्यानमालेचे आयोजनासंदर्भात आयोजित बैठकीत बोलताना वसंत लोढा.

नगर –नगर शहरात सांस्कृतिक चळवळ रुजावी, विचार मंथन व्हावे,सामाजिक व राजकीय विषयांवर संवाद घडावा. तसेच तरुणाईच्या जगण्याला वैचारिक बळ देणारी, सु–संस्कारित विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी आणि समाजात क्रांतीकारी बदल घडविण्यासाठी,विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींची व चांगल्या सकस समाजाच्या निर्मितीसाठी सकारात्मक विचारांचे आदान प्रदान होण्यासाठी दरवर्षी पंडित दीनदयाळ पतसंस्था व पंडित दीनदयाळ परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दीनदयाळ व्याख्यानमालाचे आयोजन करण्यात येते. या वर्षीही ऑक्टोंबर महिन्यात दिग्गज वक्त्यांच्या उपस्थितीत या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येणार आहे.

पं.दीनदयाळ पतसंस्था व दीनदयाळ परिवार,अ. नगर यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दीनदयाळ व्याख्यानमालेचे नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे संस्थापक व भाजपचे ज्येष्ठ नेते वसंत लोढा, अध्यक्ष धनंजय तागडे, सचिव बाळासाहेब भुजबळ, कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल,उद्योजक मनिष सोमानी, मिलिंद कोलते, राहुल जामगावकर, किशोर गांधी, महावीर कांकरिया, संग्राम म्हस्के, गोकुळ काळे, शामराव वाघस्कर, कवी दत्तात्रय वारकड, अमोल भांबरकर, निलेश चिपाडे आदी उपस्थित होते.

धनंजय तागडे म्हणाले, व्याख्यानमाले करिता खासदार मनोज तिवारी, खासदार कंगना राणावत, आंतरराष्ट्रीय खेळाडू पी टी उषा, थोर समाजसेविका सुधा मूर्ती, टीव्ही स्टार हास्य कवी आदित्य जैन, सिनेअभिनेते महेश मांजरेकर आणि प्रभाकर सूर्यवंशी या दिग्गज वक्त्यांना संपर्क करण्याचे प्रयत्न चालू आहेत.त्याचप्रमाणे नक्षलवादावर आधारित गडचिरोली कार्यकर्त्यांनी बसवलेले दोन अंकी नाटक प्रबोधनात्मक कार्यक्रम म्हणून या व्याख्यानमाले मध्ये सादर करण्यात येईल. सुरज अग्रवाल म्हणाले, गेल्या १२ वर्षापासून होणाऱ्या या व्याख्यानमालेला नगरकर रसिक व दर्दी प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे. या व्याख्यानमालेच्या सांस्कृतिक मेजवानी ची नगरकर दरवर्षी आवर्जून वाट पाहत असतात. सुत्रसंचलन सुरज अग्रवाल यांनी केले. तर आभार बाळासाहेब भुजबळ यांनी मानले.

# प्रा.डॉ. भाग्यशाली कार्ले यांच्या हर्बल औषध संशोधनाला भारत सरकारचे पेटंट


प्रा.डॉ. भाग्यशाली कार्ले यांच्या हर्बल औषध संशोधनाला भारत सरकारचे पेटंट मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना न्यू आर्ट्सचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे.

नगर – येथील न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या वनस्पतीशास्त्र विभागातील प्राध्यापिका डॉ. भाग्यशाली अशोक कार्ले यांच्या हर्बल औषध संशोधनाला भारत सरकारकडून अधिकृत पेटंट मंजूर झाले आहे. भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाने ७ ऑगस्ट रोजी या संशोधनाचे पेटंट प्रमाणपत्र त्यांना दिले. या पेटंटसाठी त्यांनी एकमेव संशोधक म्हणून काम केले, ही विशेष बाब असून औषधशास्त्र विषयात 'युटीलिटी पेटंट' मिळणे ही विज्ञान क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी मानली जाते.

'हर्बल कम्पोझिशन फॉर मायोकार्डियल प्रोटेक्शन अँड प्रोसेस फॉर प्रिपेअरिंग देअरऑफ' या विषयावर डॉ. भाग्यशाली कार्ले यांनी संशोधन केले. पेटंटसाठी डॉ. कार्ले यांनी सुमारे चार वर्षे सातत्याने संशोधन केले. पुण्यातील नामांकित संस्थांमध्ये त्यांनी या संशोधनाचे काम केले. संशोधनासाठी त्यांना पुणे येथील डॉ. डी.वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस अँड रिसर्च या संस्थेच्या डॉ. वैशाली उंडाळे, नाशिकच्या चिंचोली येथील पी.आर. इ. एस. कॉलेज ऑफ फार्मसीचे डॉ. शरदचंद्र कार्ले आणि डॉ. विकास कुंदे, तसेच डॉ. दिगंबर अहिरे यांनी मार्गदर्शन केले.

डॉ. भाग्यशाली कार्ले यांच्या पेटंट अर्जाला मान्यता देत भारत सरकारने २० वर्षांच्या कालावधीसाठी पेटंट मंजूर केले आहे. हर्बल औषध संशोधनाच्या क्षेत्रात डॉ. भाग्यशाली कार्ले यांनी मिळविलेले हे यश अहिल्यानगरच्या शैक्षणिक व संशोधन क्षेत्रासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.

त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष राम चंद्र दरे, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, सहसचिव इंजि. मुकेश मुळे तसेच प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी डॉ. कार्ले यांचे अभिनंदन केले आहे.

# अर्धवट शिक्षण सोडलेल्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणाऱ्या नगरच्या भाई सथ्था नाईट हायस्कूलचा राज्यस्तरावर गौरव

नगर – विविध कारणांमुळे अर्धवट शिक्षण सोडावे लागलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शहरातील हिंद सेवा मंडळाच्या भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये 'शिक्षणदूत' मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेला आजी–माजी विद्यार्थी, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यांच्या प्रयत्नातून मोठ्या संख्येने शिक्षणापासून दूर गेलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा शाळेत प्रवेश देण्यात आला.



मासूम संस्थेचे डायरेक्टर कमलाकर माने, एस.एस.सी. प्रमुख गुरुप्रसाद पाटील आणि प्रोग्राम हेड संदीप शेलार यांच्या हस्ते ट्रॉफी व सन्मानपत्र स्वीकारताना भाई सथ्था नाईट हायस्कूलचे चेअरमन डॉ. पारस कोठारी, प्राचार्य सुनील सुसरे आणि ज्येष्ठ शिक्षक गजेंद्र गाडगीळ.

मुंबई येथील मासूम संस्थेच्या मूल्यांकनात सर्वाधिक विद्यार्थी प्रवेशित करून त्यांना इयत्ता दहावीच्या परीक्षेला बसविणाऱ्या शाळांमध्ये भाई सथ्था नाईट हायस्कूलने राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शाळेला ट्रॉफी व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. मासूम संस्थेचे डायरेक्टर कमलाकर माने, एस.एस.सी. प्रमुख गुरुप्रसाद पाटील आणि प्रोग्राम हेड संदीप शेलार यांच्या हस्ते नाईट हायस्कूलचे चेअरमन डॉ. पारस कोठारी, प्राचार्य सुनील सुसरे आणि ज्येष्ठ शिक्षक गजेंद्र गाडगीळ यांना ट्रॉफी व सन्मानपत्र प्रदान करण्यात आले.

यावेळी बोलताना डॉ. पारस कोठारी म्हणाले की, भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील मैत्रीपूर्ण संबंधातून शिक्षण दिले जाते. शिक्षणाची संधी कोणत्याही वयात मिळू शकते, ही या शाळेची वैशिष्ट्यपूर्ण भूमिका आहे. त्यामुळे येथे एकाच वर्गात नवरा–बायको, सासू–सून, आई–मुलगी तसेच वडील–मुलगा यांनी एकत्र शिक्षण घेऊन यशस्वीरीत्या परीक्षा उत्तीर्ण झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. शिक्षणासाठी वयाची मर्यादा नसून इच्छाशक्ती, जिद्द आणि आयुष्यात पुढे जाण्याची तयारी महत्त्वाची आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. रात्रशाळेत केवळ पाठ्यपुस्तकांपुरते शिक्षण न देता विद्यार्थ्यांना जीवनात सक्षमपणे उभे राहण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन आणि कौशल्यविकासावरही भर दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले. तर मासूम संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा व विविध व्यावसायिक प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन दिले जात असल्याबद्दल मासूम संस्थेच्या संचालिका निकिता केतकर यांचे विशेष आभार मानले.

मासूम संस्थेचे डायरेक्टर कमलाकर माने म्हणाले की, शिक्षण ही केवळ शाळेत जाण्याची प्रक्रिया नाही, तर माणसाला आत्मविश्वास, ज्ञान, कौशल्य आणि स्वाभिमान देणारी शक्ती आहे. परिस्थितीमुळे एखाद्या विद्यार्थ्याचे शिक्षण अर्धवट राहिले, म्हणून त्याच्या आयुष्यातील संधी संपत नाहीत. योग्य मार्गदर्शन आणि जिद्द असेल तर कोणत्याही वयात पुन्हा शिक्षण सुरू करता येते, हे भाई सथ्था नाईट हायस्कूलने आपल्या कार्यातून सिद्ध केले आहे. आजच्या काळात केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नाही. विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्य, आत्मविश्वास, संवादकौशल्य आणि प्रत्यक्ष जीवनात उपयोगी पडणारे प्रशिक्षण मिळणे आवश्यक आहे. या दृष्टिकोनातून मासूम संस्थेच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिली जात असल्याचे त्यांनी सांगितले.



'नशा मुक्त अहिल्यानगर' अभियानातंर्गत जनजागृती रॅलीत सहभागी उर्दू शाळेतील विद्यार्थिनी.

# नशा मुक्त शहरासाठी उर्दू शाळेची जनजागृती रॅली

नगर – अहिल्यानगर जिल्हा पोलीस दल व जिल्हा प्रशासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'नशा मुक्त अहिल्यानगर' अभियानातंर्गत नागोरी मुस्लिम मिसगर जमात ट्रस्ट संचालित अहमदनगर उर्दू प्रायमरी स्कूल, अहमदनगर उर्दू हायस्कूल व मिसगर ज्युनिअर कॉलेज यांच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांनी शहरातून जनजागृती रॅली काढली. या रॅलीद्वारे नशामुक्तीचा संदेश देण्यात आला.

रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीचा संदेश देणारे विविध फलक हातात घेत नागरिकांमध्ये प्रभावी जनजागृती करण्यात आली. नशा छोडो, भारत जोडो, नशा मिटाव, देश बचाव, भविष्य बनाव, सेहत का खयाल रखो अशा घोषणा देत विद्यार्थ्यांनी मंगलगेट, कोठला भागातून रॅली काढली. या घोषणांमुळे परिसर व्यसनमुक्तीच्या संदेशाने दुमदुमून गेला.

पोलीस प्रशासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालकांनी अहिल्यानगर जिल्हा व्यसनमुक्त करण्याची सामूहिक प्रतिज्ञा घेतली. समाजातील तरुण पिढीला अंमली पदार्थ व इतर व्यसनांपासून दूर ठेवण्याचा तसेच निरोगी व सुदृढ समाज घडविण्याचा संकल्पही सर्वांनी व्यक्त केला.

या अभियानासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, शिक्षणाधिकारी संध्याताई गायकवाड तसेच अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांचे मार्गदर्शन लाभले. या रॅलीत शालेय विद्यार्थ्यांसह शिक्षक देखील सहभागी झाले होते.



के. जी.महाविद्यालयात जागतिक ग्रंथपाल दिनानिमित्त एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करताना डॉ. स्वाती मुनोत व शिक्षक वर्ग.

# के. जी.महाविद्यालयात जागतिक ग्रंथपाल दिन व अँटी रॅगिंग डे साजरा

नगर – के. जी. महाविद्यालयात जागतिक ग्रंथपाल दिन आणि अँटी रॅगिंग डे उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात संचालिका डॉ. स्वाती मुनोत यांनी एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. जागतिक ग्रंथपाल दिनानिमित्त डॉ. स्वाती मुनोत यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचे महत्त्व, वाचनाची आवड आणि ग्रंथालयाचा योग्य वापर याबाबत तसेच विद्यार्थ्यांनी विविध पुस्तके व संदर्भग्रंथांचा उपयोग करून ज्ञानवृद्धी करावी, असे मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच अँटी रॅगिंग डे निमित्त विद्यार्थ्यांना रॅगिंगविरोधी कायदे, रॅगिंगचे दुष्परिणाम आणि महाविद्यालयातील रॅगिंगविरोधी नियम याबाबत माहिती देण्यात आली. महाविद्यालय रॅगिंगमुक्त ठेवण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल सौ. हर्षाली रासकर यांनी केले. तसेच आभार प्रदर्शन प्रा. स्नेहल बोरावके यांनी केले. यावेळी डॉ. वर्षा कीर्तने, डॉ. प्रशांत खोपटीकर, प्रा. योगेश चाकवते, प्रा. रोहिणी क्षीरसागर व विद्यार्थी उपस्थित होते.

# सायंकाळी ६.३० ते रात्री ९ मोबाईल बंद ठेवण्याची विद्यार्थ्यांनी घेतली शपथ

नगर – श्रीराम विद्यालय, राळेगण (म्हसोबा) येथे रोज सायंकाळी ६.३० ते रात्री ९ यावेळेत मोबाईल बंद ठेवण्याची विद्यार्थ्यांनी घेतली शपथ घेतली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास गुंड होते. प्रमुख पाहुणे म्हणून निर्भया पथकाच्या पोलीस उपनिरीक्षक प्रियंका आठरे, पवार मॅडम, संदीप थोरात, म्हाडेकर मॅडम, खताळ मॅडम उपस्थित होते. कार्यक्रमाचा मुख्य उद्देश मोबाईलचा गैरवापर आणि मुलींची सुरक्षितता हा होता. यावेळी उपस्थित सर्व विद्यार्थ्यानी संध्याकाळी ६.३० ते रात्री ९.०० या वेळेत मोबाईल बंद ठेवण्याची शपथ घेतली.



श्रीराम विद्यालय, राळेगण (म्हसोबा) येथे विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेविषयी बोलताना पोलीस उपनिरीक्षक प्रियंका आठरे.

प्रमुख वक्त्या पोलीस उपनिरीक्षक प्रियंका आठरे यांनी विद्यार्थिनींना सुरक्षिततेविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. स्वतःचे संरक्षण कसे करावे, कोणत्याही प्रकारच्या गैरप्रकारांना घाबरून न जाता त्वरित पालक, शिक्षक किंवा पोलिसांशी संपर्क साधावा असे त्यांनी आवाहन केले.

माजी विद्यार्थी संघांचे अध्यक्ष प्रा. प्रसाद दुरेकर यांनी मोबाईलच्या अतिवापरामुळे होणारे शैक्षणिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम समजावून सांगितले. त्यांनी दररोज सायंकाळी ६.३० ते ९.०० या वेळेत 'मोबाईल बंद' हा उपक्रम राबविण्याचे आवाहन केले. विद्यालयाचे माजी विद्यार्थी आयएएस विजय कुलांगे यांनीही लिखित पत्राद्वारे विद्यार्थ्यांना मोबाईलमुक्त अभियानासाठी मार्गदर्शन केले तसेच माजी विद्यार्थी संघाच्या या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास गुंड यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात, विद्यालयात मोबाईलमुक्त अभियानाचा सातत्याने पाठपुरावा करू तसेच गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असे आश्वासन दिले.

उपस्थित विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांनी मोबाईल बंदीची शपथ घेत या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसह सुरक्षित व सुसंस्कृत समाज घडविण्यासाठी अशा जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन अत्यंत उपयुक्त असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला.

कार्यक्रमासाठी अध्यक्षांची निवड श्री. झेंडे आणि अनुमोदन श्री.बाणकर यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.भापकर यांनी केले.कार्यक्रमासाठी मार्केट कमिटीचे संचालक सुधीर भापकर पाटील, माजी मुख्याध्यापक प्रा. मछींदर सर, संतोष हराळ, भरत हराळ, तुषार साळवे,शशिकांत पांडुळे, अनिल पिंपळे, विठ्ठल कोतकर, सुभाष डावखरे इ. पालक आणि ग्रामस्थ उपस्थित होते . कार्यक्रमाचे आयोजन एसएससी २००८ बॅच च्या माजी विद्यार्थ्यांनी केले होते.

# ...अन्यथा शालेय क्रीडा स्पर्धेवर बहिष्कार टाकणार

## अहिल्यानगर युवा शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाचा इशारा

नगर – जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने शालेय क्रीडा स्पर्धा २०२६–२०२७ आयोजन नियोजन संदर्भात नुकतीच न्यू आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स कॉलेज अहिल्यानगर येथे सभा घेण्यात आली. या सभेमध्ये अहिल्यानगर जिल्हा युवा शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाच्या वतीने राज्यात मंजूर असलेली केंद्र स्तरावरील ४८६० क्रीडा शिक्षकाची पदे गेल्या अनेक काळापासून मंजूर असूनही भरली गेले नाहीत यासंदर्भात निषेध नोंदवण्यात आला व ही पदे तात्काळ न भरल्यास आम्ही शालेय क्रीडा स्पर्धेवरती बहिष्कार टाकू, कुठल्याही शालेय क्रीडा स्पर्धेला आम्ही सहकार्य करणार नाही अशा प्रकारची भूमिका घेण्यात आली.



जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांना मागण्यांचे निवेदन देताना अहिल्यानगर युवा शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाचे पदाधिकारी.

त्या प्रकारचे निवेदन युवा संघटनेने जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांच्याकडे देण्यात आले यावेळेस संघटनेचे जिल्हाध्यक्ष महेश आनंदकर, सचिव अमोल ठोंबे, जिल्हा मार्गदर्शक स्वप्निल वारुळे, संदीप राहणे खजिनदार श्री प्रशांत पाटोळे अमित बडदे, सुरेश वाघ, ऋषिकेश घोडेकर, चेतन जावळे, सार्थक भोसले, सचिन माकासरे, प्रवीण शिंदे, संदीप डोंगरे, साहिल राठोड, स्वप्निल कोतकर, वसीम शेख आदी हजर होते.

अहिल्यानगर जिल्हा व नाशिक विभागाचे सचिव अमोल ठोंबे यांनी मनोगत व्यक्त करताना आज अनेक वर्षापासून क्रीडा शिक्षकांची भरती नसल्यामुळे कशाप्रकारे ग्रामीण भागात खेळाडूंचं नुकसान होत आहे ग्रामीण भागातील विद्यार्थी हा खेळापासून व क्रीडा क्षेत्रापासून कशाप्रकारे वंचित राहत आहे याबद्दल माहिती दिली. निवेदन दिल्यानंतर जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी या समस्येची दखल घेत लवकरच उच्च स्तरावर ती या विषयासंदर्भात पाठपुरावा करू व हा विषय उच्चस्तरावरती मांडू असे आश्वासन युवा संघटनेला दिले.

# प्रा. डॉ. जयेश पवार यांना पीएच.डी पदवी प्रदान

नगर – पेमराज सारडा महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. जयेश पवार यांना नांदेडच्या स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाची भौतिकशस्त्र विषयातील पीएच.डी. पदवी नुकतीच प्रदान करण्यात आली. त्यानिमित्ताने सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करून अभिंनदन करण्यात आले.



प्रा. डॉ. जयेश पवार यांना पीएच.डी पदवी मिळाल्याबद्दल सत्कार करताना प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित आदी.

प्रा. डॉ. जयेश पवार यांनी भौतिकशास्त्र विभागत गॅस सेन्सिंग एप्लिकेशन या विषयवर संशोधन करून आपला प्रबंध सादर केला होता. संशोधन दरम्यान त्यांनी २०२२ मध्ये गॅस सेन्सर तंत्रज्ञानाशी संबंधित पेटंट संपादन केले. तसेच त्यांच्या संशोधनावर आधारित अनेक शोधनिबंध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नियतकालिकांमध्ये प्रकाशित झाले. प्रा.पवार यांनी २०१७ मध्ये सीएसआयआर–यूजीसी नेट ही राष्ट्रीय पात्रता परीक्षाही यशस्वीरित्या उत्तीर्ण केली आहे.

या संशोधन कार्यासाठी प्रा.जयेश पवार यांना डॉ. राजेश जोशी यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

तसेच हिंद सेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, प्राचार्य महेश्वरी गावित, उपप्राचार्य प्रा. मिलिंद देशपांडे, उपप्राचार्य प्रा. गिरीश पाखरे, प्रा. राजेश पाटणी, अशोक असेरी यांनी संशोधन कार्यासाठी सातत्याने प्रोत्साहन व मोलाचे सहकार्य दिले.

# वयाच्या १६ व्या वर्षी दीक्षा घेणारे अलौकिक प्रविणऋषीजी महाराज

नगर शहराचे आध्यात्मिक चातुर्मास जीवन अधिक समरसून जात आहे, असे दिसते. याचे एक महत्त्वाचे कारण असे आहे की, आपले आध्यात्मिक जीवन मार्गदर्शक व सहज ध्यान प्रशिक्षक प्रविण ऋषी हे आहेत. ते प्रभावी वक्ते आणि आजच्या करिष्माई आणि प्रभावशाली जैन साधूंमध्ये उपाध्याय श्री ऋषी प्रवीणजी यांना एक बहुआयामी गुरु म्हणून अत्यंत आदरणीय मानले जात आहे. या शिवाय ते एक विचारवंत, शास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, धार्मिक शिक्षकही आहेत आणि जर त्यांचे सर्वोत्तम वर्णन करण्यासाठी काही शब्द वापरायचा असेल, तर तो म्हणजे 'व्याख्याकार' !'.याचा अर्थ असा – पवित्र ग्रंथांमधील दडलेल्या सत्याची पुनर्व्याख्या करणारे!'..पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जेव्हा महाराष्ट्रात जैन साधू उपाध्याय ऋषी प्रवीण यांची भेट घेतली, तेव्हा ते म्हणाले होते की, उपाध्याय श्री ऋषी प्रवीणजींना भेटून खूप आनंद झाला. जैन ग्रंथ आणि संस्कृतीच्या अभ्यासासाठी त्यांचा सर्वत्र आदर केला जातो. सलोखा आणि बंधुभाव वाढवण्यासाठी त्यांनी भारतभर व्यापक प्रवास केला आहे.

असे ऋषी प्रविण यांच्या आपल्या शहरात चातुर्मास प्रवेशा नंतर त्यांचा वैयक्तिक परिचय मला अनेकांनी विचारला होता. या लेखातून तो मी व्यक्त करण्याचा प्रयत्न करीत आहे. अनेकांना माहीत नसेल की ते आपल्या नगर जिल्ह्यातीलच आहेत. त्यांचा जन्म ७ ऑक्टोबर १९५७ रोजी घोडेगाव (अहमदनगर, महाराष्ट्र) येथे दगडूलाल देसरडा आणि श्रीमती चंपाबाई या श्रद्धाळू आई–वडिलांच्या पोटी झाला आहे. त्यांचे तसे शालेय शिक्षण फार झाले नाही. घोडेगावला त्यावेळी इयत्ता दहावीपर्यंतच शिक्षण होते व तेव्हढे झाले. परंतु धार्मिक प्रवृत्ती नसतानाही, श्रमण संघाचे आचार्य श्री आनंदऋषीजी यांच्याप्रती असलेल्या त्यांच्या वडिलांच्या भक्तीचा त्यांच्यावर खोलवर प्रभाव पडला होता. त्यामुळे वयाच्या १६ व्या वर्षी त्यांनी जैन संन्यासाची दीक्षा घेतली. २४ मार्च १९७४ रोजी भुसावळ (खानदेश, महाराष्ट्र) येथे आचार्यांच्या चरणी त्यांचा हा दीक्षाविधी झाला होता. कालांतराने, ते आध्यात्मिक मार्गात अधिक खोलवर मग्न झाल्यामुळे, त्यांची सांसारिक गोष्टींपासूनची अलिप्तता वाढत गेली. दीक्षा घेतल्यानंतर ते आपला बहुतेक वेळ पूर्ण निष्ठेने आपल्या गुरूंच्या सेवेत आणि धर्मग्रंथांच्या अभ्यासात घालवत असत. त्यांनी आचार्य श्री आनंद ऋषीजींच्या मार्गदर्शनाखाली १८ वर्षे जैन आगमांचा सखोल अभ्यास केला. संस्कृत, प्राकृत, अर्धमागधी भाषा शिकले. त्यांच्या उपजत, खऱ्या जिज्ञासेने त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व घडले. कदाचित याच कारणामुळे त्यांची प्रवचने सर्व स्तरांतील श्रोत्यांना आजकाल आकर्षित करीत आहेत. ते आपल्या तार्किक विचारांनी समाजाची रूढीवादी आणि अंधश्रद्धाळू मानसिकता दूर करून टाकण्यात पारंगत आहेत. आपल्या प्रभावी स्पष्टीकरणांनी तरुणांना आकर्षित करण्यातही ते कुशल आहेत.त्यामुळे त्यांची प्रवचने ऐकून अनेक तरुण त्यांचे कट्टर अनुयायी बनले आहेत.आपल्या ज्ञानाचा पाया अधिक मजबूत करण्यासाठी, प्रविण ऋषींनी सुमारे ११ महिने एकांतात कठोर ध्यान आणि तपश्चर्या केली. त्यांच्या अफाट ज्ञानाची आणि आध्यात्मिक साधनेची दखल घेऊन, जैन आचार्य श्री डॉ. शिवमुनिजी (श्रमण संघाचे चौथे पट्टधर) यांनी २००४ साली त्यांना 'उपाध्याय' ही पदवी प्रदान केली.आपल्या प्रेरणादायी शब्दांनी त्यांनी महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान, दिल्ली, उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब, आंध्र प्रदेश, तामिळनाडू आणि कर्नाटक येथील लाखो लोकांना प्रेरित केले. आणि जगभरातील लोकांशी आभासीरित्या संपर्क साधला आहे. जैन धर्माचा प्रसार करण्यासाठी ते दरवर्षी



अनवाणी पायांनी २५०० किलोमीटरहून अधिक प्रवास ते करतात.यंदाचा चातुर्मास आपल्या नगर शहरात खूप उत्साहाने साजरा होत आहे.

आपल्या अद्वितीय कथनशैलीतून तीर्थंकर महावीरांचे जीवन आणि शिकवण ते जिवंत करतात. त्या महान संतांच्या जीवनातील घटनांचे इतक्या सखोलतेने ते वर्णन करतात की श्रोते जणू त्या काळातच पोहोचतात. महावीर गाथेचे त्यांचे भावपूर्ण पठण तीर्थंकरांबद्दलचे त्यांचे दिव्य प्रेम आणि भक्ती त्या मध्ये स्पष्टपणे ते दर्शवितात, आणि त्यामुळे हा अनुभव श्रोत्यांना अद्वितीय ठरतो.अनेक वर्षांपासून प्रविण ऋषी उत्तराध्यान सूत्राचे ज्ञान देत आहेत, ज्यात तीर्थंकर महावीरांची अंतिम शिकवण आहे. हा कार्यक्रम दरवर्षी २१ दिवस चालतो. या मालिकेचे वैशिष्ट्य हे आहे की, या काळात बाह्य जगापासून सर्व जण पूर्णपणे अलिप्त राहतात आणि मौन व ध्यानात वेळ घालवून तीर्थंकर महावीरांच्या आध्यात्मिक शक्तीशी ते जोडले जातात. ऋषी प्रविण केवळ त्या महान ग्रंथावर प्रवचन देतानाच बोलतात. या प्रयत्नाद्वारे त्यांनी असंख्य हृदयांमध्ये दिव्य श्रद्धा आजपर्यंत निर्माण केली आहे. प्राचीन ग्रंथ आणि परंपरांमधून प्रेरणा घेऊन, त्यांचे कार्यक्रम समकालीन समाजाचे संगोपन आणि उन्नती करण्यासाठी समर्पित आहेत. हे उदात्त ध्येय साध्य करण्यासाठी, त्यांनी प्राचीन आणि आधुनिक, अध्यात्म आणि विज्ञान, तसेच तत्त्वज्ञान आणि व्यवहार्यता यांच्यात प्रशंसनीय संतुलन साधले आहे. त्यांचे 'नवकार कलश' आणि 'गौतम निधी' हे उपक्रम प्रत्येक टप्प्यावर समाजाला नव्याने आकार देत आहेत. कर्माच्या रहस्यावरील त्यांची प्रवचने साधकांना त्यांचे हेतू आणि कृती यांचे विश्लेषण करण्यास मदत करतात. त्याहूनही अधिक उपयुक्त म्हणजे, त्यांनी ध्यान, तपश्चर्या, उपवास, क्षमा आणि प्रार्थना यांसारख्या पारंपरिक पद्धतींमध्ये नाविन्यपूर्ण दृष्टिकोन सादर केले आहेत. ऋषी प्रवीणजी आध्यात्मिक परिवर्तनाला प्रेरणा देण्यासाठी आपले प्रयत्न सतत विस्तारत आहेत. जेव्हा जेव्हा त्यांना एखाद्या व्यक्ती, कुटुंब किंवा समाजात अंधार, अंधश्रद्धा, गोंधळ किंवा स्थिरता आढळते, तेव्हा ते आपल्या प्रवचने, कार्यशाळा आणि कार्यक्रमांद्वारे सर्वांगीण उपाय सादर करतात.उपाध्याय श्री ऋषी प्रवीण यांनी संकल्पित केलेले, अर्हम विज्ञा हे जीवनातील विविध समस्यांवर उपाय देणारे एक अटळ स्थान आहे; गर्भधारणेपासून ते मृत्यूपर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेवर ते मार्गदर्शन करतात. आगमांच्या अभ्यासातून आणि विवेचनातून प्रेरणा घेऊन, तीर्थंकर महावीरांना आपले गुरू मानून, खरे तर त्यांनी आपल्याला एक आनंदमय, करुणामय आणि सर्वांगीण जीवनशैली प्रदान करण्यासाठी आपले जीवन समर्पित केले आहे.शक्य तितक्या जास्त लोकांचे जीवन उन्नत करण्यासाठी, तीर्थंकर महावीरांची संशोधनात्मक शिकवण सोप्या, व्यावहारिक आणि प्रभावी पद्धतीने देणे, हे त्यांचे ध्येय आहे. एक सच्चे गुरू म्हणून, ते तीर्थंकर महावीरांच्या तत्त्वज्ञानानुसार जगण्याचे एक जिवंत उदाहरण आहेत, जे तत्त्वज्ञान पश्चात्ताप, प्रायश्चित्त आणि क्षमा यांसारख्या साध्या तत्त्वांवर आधारित आहे.

जैन धर्म हा एक प्राचीन आणि शाश्वत धर्म आहे, ज्याला आरंभ किंवा अंत नाही. युगानुयुगे तीर्थंकरांनी हा धर्म जनसामान्यांपर्यंत पोहोचवला आहे आणि वेळोवेळी या धार्मिक प्रणालीचे पुनरुज्जीवन केले आहे. सध्या, आपण सुमारे २,५०० वर्षांपूर्वी तीर्थंकर महावीरांनी स्थापित केलेल्या धार्मिक प्रणालीचे पालन करतो. ते जैन धर्माचे चोविसावे तीर्थंकर होते. त्यांनी अहिंसा आणि सर्वांप्रति करुणेच्या महत्त्वावर जोर देऊन या महान धर्माचे पुनरुज्जीवन केले. त्यांनी प्रचलित पशूबळी आणि सनातनी धार्मिक प्रथांना विरोध केला. त्यांनी एक धार्मिक संघ स्थापन केला आणि मोठ्या संख्येने शिष्य जमवले. जैन आचार्य, भिक्षू आणि भिक्षुणी आपले जीवन या धर्माच्या प्रसारासाठी समर्पित करतात. जैन समाज त्यांना धार्मिक गुरू म्हणून स्वीकारतो आणि त्यांचा आदर करतो. जैन धर्म हा करुणा, अहिंसा आणि अपरिग्रहाचा धर्म आहे. तो सांगतो की, लहान–मोठ्या सर्व जीवांप्रति मैत्री आणि वैश्विक प्रेम हाच शाश्वत आनंदाचा मार्ग आहे. ही कल्पना या श्रद्धेतून येते की सर्व प्राणी समान आहेत कारण प्रत्येकामध्ये एक दिव्य आत्मा असतो. हे जाणून, आपण कोणत्याही सजीवाला इजा पोहोचवू नये आणि शांततेने सहजीवन जगावे यासाठी ऋषी प्रविण कार्य करताना आज आपल्या नगर शहरात दिसत आहेत.

व्यायामाचा अभाव, अयोग्य आहार आणि अपुरी झोप यामुळे आरोग्य धोक्यात येत आहे. सतत पुढे जाण्याच्या आणि यश मिळवण्याच्या दबावामुळे ताण वाढतो. अशा या दिवसात ऋषी प्रविण यांचा चातुर्मास समाजाला निश्चितच उपकारक राहील, यात शंका नाही.

लेखक – **प्रा. जवाहर मुथा जैन**

# धम्माल मनोरंजन

## सुविचार



''पुस्तकाची किमत रत्नापेक्षाही अधिक आहे.''

## दिनविशेष १४ ऑगस्ट

१६६० : मुघल सैन्याने चाकणचा किल्ला ताब्यात घेतला. १८४८ : ओरेगॉनला अमेरिकेचा प्रदेश म्हणून मान्यता देण्यात आली.१८६२ : कलकत्ता उच्च न्यायालयाची स्थापना.१८६२ : मुंबई उच्च न्यायालयाची स्थापना.१८९३ : मोटार वाहनांची नोंदणी सुरू करणारा फ्रान्स हा पहिला देश आहे.

१९४५ : दोन अणुबॉम्बच्या भीतीने होणारा उच्चाटन जपानच्या शरणागतीला आणि दुसरे महायुद्धाच्या समाप्तीस कारणीभूत ठरले.

१९४३ : नागपूर विद्यापीठाने स्वतंत्र वीर सावरकर यांना मानद डी. लिट. पदवी प्रदान केली.

१९४७ : पाकिस्तानला युनायटेड किंग्डमपासून स्वातंत्र्य मिळाले.१९४७ : स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर जनरल म्हणून लॉर्ड माउंटबॅटन यांची नियुक्ती.

१९५८ : एअर इंडियाने दिल्ली–मॉस्को सेवा सुरू केली.

१९७१ : बहरीनला युनायटेड किंग्डमपासून स्वातंत्र्य मिळाले.

२००६ : श्रीलंकेच्या हवाई दलाने केलेल्या बॉम्बहल्ल्यात चेंचोलाई येथे ६१ तामिळ मुलींचा मृत्यू झाला.

२०१० : सिंगापूर येथे पहिले युवा ऑलिम्पिक गेम्स आयोजित करण्यात आले.

दिनविशेष – जन्म :१७७७ : हान्स क्रिस्टियन ओरस्टेड डॅनिश भौतिकशास्त्रज्ञ यांचा जन्म. (मृत्यू : ९ मार्च १८५१)

१९०७ : गोदावरी परुळेकर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्या, सामाजिक कार्यकर्त्या लेखिका. महाराष्ट्रातील पहिल्या स्त्री वकील यांचा जन्म. (मृत्यू : ८ ऑक्टोबर १९९६)

१९११ : भारतीय तत्त्वज्ञानी वेदतिरी महाऋषी यांचा जन्म.

१९२५ : जयवंत दळवी साहित्यिक, नाटककार पत्रकार यांचा जन्म. (मृत्यू : १६ सप्टेंबर १९९४)

१९५७ : जॉनी लिव्हर विनोदी अभिनेता यांचा जन्म.

१९६२ : रमीझ राजा पाकिस्तानी क्रिकेटपटू समालोचक यांचा जन्म.

१९६८ : प्रवीण आमरे क्रिकेटपटू यांचा जन्म. मृत्यू :१९५८ : जीन फ्रेडरिक जोलिओटफ मूलद्रव्याच्या समस्थानिकांच्या शोधाबद्दल नोबेल पारितोषिक मिळवणारे फ्रेंच पदार्थ वैज्ञानिक यांचे निधन. (जन्म : १९ मार्च १९००)


१९८४ : खाशाबा जाधव १९५२ च्या हेलसिंकी ऑलिम्पिकमधे वैयक्तिक पदक मिळवणारे पहिले भारतीय कुस्तीगीर यांचे निधन. (जन्म : १५ जानेवारी १९२६)

१९८८ : एन्झो फेरारी रेस कार निर्माते आणि ड्रायव्हर यांचे निधन. (जन्म : १८ फेब्रुवारी १८९८)

२०११ : शम्मी कपूर हिन्दी चित्रपट अभिनेते निर्माते यांचे निधन. (जन्म : २१ ऑक्टोबर १९३१)

२०१२ : विलासराव देशमुख महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि केंद्रीय अवजड उद्योग मंत्री यांचे निधन. (जन्म : २६ मे १९४५)

## महाशब्दकोडे



### आडवे संकेत

१) आमिर खान, सलमान खान यांचा एक चित्रपट
८) पांढरा ढोंगी साधू
१०) कोठीवर नाचणारी
११) एका पक्षाचे नाव
१२) वाजणे, बोलणे
१४) xxx खडी तुझ्या लावी वेडमला.....
१५) समेट
१७) इंदिरा गांधीचा वीस सुत्री कार्यक्रम
१९) लक्ष्मी
२०) त्रास
२२) संबंध (हिं.)
२३) वाहण्याची जमीन
२५) तलाठी
२७) खट आवाज करुन
२८) धरती
३०) नाताचा पुत्र
३१) आरी
३२) सनदशीर
३५) येण्याचा शब्द, आवक
३७) गमणे, मौजेणे वेळ जाणे
३८) रात्र ३९) चक्षु
४०) फिक्स होणे
४१) राक्षस, दैत्य
४३) झरा, दयातार्थ
४४) नीरव, शांत
४६) एक महाकाय वृक्ष
४७) दंड, शासन
४८) भट्टी
४९) छोट्या पडद्यावरची माधूरी
५२) शुद्ध
५३) फेकून देण्याजोगे, टाकाऊ

### उभे संकेत

१) शेवट
२) एक हिंदी चित्रपट
३) पराजयच्या विरुद्ध
४) काबुल या देशाची राजधानी आहे
५) विरोधास न जुमानता काम करणे
६) बारा महिने चाकरी घेऊन अकरा महिन्याचा पगार घेण्याची पद्धत
७) अपशकून
८) पू
९) गणपती
१३) पस्तावा
१६) तोंडोतोंडी येणे
१७) स्थुल नकाशा, कच्चा कागद
१८) किरकोळ
२१) गोंधळणे
२४) पेज, कांजी
२६) रंग, जिन्नस
२९) एक संख्या
३३) पात्रापात्रभाव
३४) वेळेचे गांभीर्य लक्षात घेणारा
३५) अपेक्षा
३६) जकार्ता या देशाची राजधानी आहे
३८) निवडण्याची पद्धत
४२) xxx सगळे गाढव (चित्रपट)
४३) एक साधू
४५) मरण्याची स्थिती
५०) एक पारदर्शक वस्तू
५१) मंडई, बाजार, रांग, ओळ

### मागील उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सा | त्वि | क | | | त | ळ | प | | वं | द | नी | य |
| रं | | च | त | को | र | | व | न | दे | व | ता | |
| गी | त | रा | मा | य | ण | | मा | | मा | | | ज |
| | | का | | ता | प | मा | न | | त | | ज | वा |
| ता | ग | डी | | | टु | र | | आ | र | स | पा | नी |
| रा | ज | | वा | न | | | ड | ग | म | | न | दी |
| धी | र | ध | री | रे | धी | रा | पो | टी | | ब | | वा |
| श | | पा | रा | श | र | | ष | | दा | दा | मु | नी |
| | पो | टा | शी | | ज | ड | ण | | स | म | ज | |
| य | ती | | | न | कु | ल | | | रा | | रा | त्र |
| म | | अ | | र | मा | | अ | प | मा | न | | स्त |
| रा | जें | द्र | कु | मा | र | | ज | ग | चा | ल | क | |
| ज | | क | ल | ई | | अ | ब | ला | | | धी | र |




१) कांच ही खालीलप्रमाणे कशी आहे?
अ)दुर्वाहक ब)मंदवाहक क)सुवाहक ड)संवाहक

२) पावसाळ्यात विजा चमकण्यामुळे कशाचे ऑक्सीडीकरण घडून येते?
अ)अमोनिया ब)नायट्रोजन क)कार्बन ड)हायड्रोजन

३) सौर ऊर्जा कोणत्या स्वरुपात असते?
अ)गॅमा प्रारणे ब)प्रकाश प्रारणे
क)विद्युत चुंबकीय प्रारणे ड) अल्फा प्रारणे

४) गुरुत्वीय त्वरणाचे सर्वात जास्त मुल्य कोठे असते?
अ)ध्रुवांवर ब)महासागराजवळ
क)पृथ्वीच्या केंद्राच्या दिशेस ड) विषुववृत्तांवर

५) साबणांवर कोणत्या गोष्टीवर अनिष्ट परिणाम होतो?
अ)आम्लता ब)फ्लोरिन क)क्षारता ड)सोडियम क्षार

६) कोणता धातू कक्षा तापमानास द्रवरुप असतो?
अ)ग्रॅफाईट ब)अल्कहोल क) पारा ड)ब्रोमीन

७) नेत्रभिंग आणि दृष्टिपटल यामधील अंतर कशाच्या आकारावर अवलंबून असते?
अ)नेत्रगोल ब)अंधबिंदू क)बाहुली ड)पारपटल

८) गतिमान पदार्थाच्या गतीला विरोध करणाऱ्या बलास काय म्हणतात?
अ)गतीय बल ब)विरोधी बल क)त्वरण बल ड)घर्षण बल

९) गजाननरावनी आपल्या मळ्यात १/३ भागात उस लावला, १/४ भागात भुईमुंग लावला व उरलेल्या २५ एकरात ज्वारी लावली तर गजाननरावांचे एकूण किती एकर शेत आहे?
अ)९० एकर ब)६० एकर क)७२ एकर ड)८० एकर

१०) हंगामी पोलिस पाटलाची नेमणूक कोण करतो?
अ)उपजिल्हाधिकारी ब)तहसिलदार
क)मुख्य कार्यकारी अधिकारी ड)जिल्हाधिकारी

११) ६४ चौरस सें.मी क्षेत्रफळ असलेले व बाजू पूर्णांकात असलेले चौरस सोडून एकूण किती आयात काढता येतील?
अ)३ ब)५ क)८ ड)९

१२) अद्रकाची अधिक उत्पादन देणारी जात कोणती?
अ)पुना ब)वायनाड क)रिओद जानिरो ड) माहिम

१३) दोन संख्यांचा मसावी सात असून त्याचा लसावी ७२ आहे त्या संख्या ३:४ प्रमाणात आहेत तर त्या संख्या कोणत्या?
अ)१६,१८ ब)२०,२२ क)१८,२४ ड)२४,२६

१४) फळे व भाजीपाला हे संरक्षण अन्न समजले जाते त्याचे प्रमुख कारण म्हणजे त्यापासून प्रामुख्याने काय मिळतात?
अ)जीवनसत्त्वे ब)खनिजे क)स्निग्धपदार्थ ड) अ व ब

१५) ऑक्टोबर २००४ च्या दुसऱ्या शनिवारी ९ तारिख होती तर त्या महिन्यातील खालीलपैकी कोणता वार पाच वेळा येणार नाही?अ)सोमवार ब)मंगळवार क)बुधवार ड)गुरुवार

उत्तरे: (१-अ), (२-ब), (३-क) , (४-अ), (५-अ), (६-क), (७-अ), (८-ड), (९-ब), (१०-ब), (११-अ), (१२-क),(१३-क ), (१४-ड), (१५-ब )

## टिप्स

■ चेहरा स्वच्छ व चमकदार होण्यासाठी एक चमचा त्रिफळा चूर्ण, मिनिट पाण्यात भिजवून चेहऱ्यावर लेप देणे.

■ चेहऱ्यावर सुरुकुत्या असेल तर त्यावर केशर व बदामची कच्च्या दुधात पेस्ट करुन लावणे.

■ केस गळत असेल तर एक मध्यम आकाराचे डाळींब सालीसकट मिक्सरमध्ये बारीक करणे. जास्वंद फूल, ब्राम्हीपाने, चमचा आवळा पावडर, मेहंदी पाने अंदाजे हे सर्व बारीक करुन ग्रॅम तिळाच्या लोखंडी कढईत मंद गॅसवर तडतड येईपर्यंत गरम करुन कोमट असतानाच एका बाटलीत भरुन ठेवावे व ते केसांना लावावे.

■ जांभळीची बी पिंपल्यवर लावणे.

## विनोद




एका बंबवाल्याने धावतच जाऊन फोन उचलला. दुसऱ्या बाजूनं विचारणा झाली. फारर ब्रिगेड स्टेशन काय?

होय! बंबवाला म्हणाला.

हे बघा, मी नुकतीच माझ्या घरपुढं एक सुंदर बाग लावली आहे आणि त्यात अत्यंत दुर्मिळ अशी फुलझाडं लावली आहेत.....! परंतु आग कोठे लागली आहे बंबवाल्यानं मध्येच थांबवून विचारलं. आणि त्या फुलझाडांसाठी मला हजारो रुपये खर्च करावे लागेले आहेत आणि... तुम्हाला फुलांचं दुकान हवं आहे का बंबवाल्यानं चिडून विचारलं. नको मला फायर ब्रिगेड स्टेशनच हवं आहे, आता मी थोडक्यात सर्व सांगतो. माझ्या शेजारच्या घराला मोठी आग लागली आहे आणि जेव्हा तुमची माणसं आग विझवायला येतील तेव्हा माझ्या बागेची नासाडी होता कामा नये!





### आडवे संकेत

१)सन् २००२ मध्ये एस. अधियनमानच्या निर्देशनात बनलेल्या या चित्रपटात शाहरुख खान, माधूरी दीक्षीत आणि सलमान खान होते.
६) XX मलिक (संगीतकार)
७) अभिषेक बचन आणि हृषीता भट्ट अभिनीत चित्रपट.
८) ईशा देओलची नायीका माँ.
९) ये XX है प्यार के (फिल्म)
१०) सन् २००१ मध्ये बनलेल्या या चित्रपटात रेखा, माधूरी दीक्षीत, महिमा चौधरी आणि मनिषा कोईराला होते.
१२) सैफ XXXX (नायक)
१४) XX या पार (फिल्म)
१६) चोरी चोरी XXXXXX (फिल्म)
१७) XXX आयेगी बारात (फिल्म)
१८) खून XXX (फिल्म)
१९) XX मेहता (नायक)
२०) XX लिव्हर (हास्य अभिनेता)
२१) सन् १९९० मध्ये बनलेल्या सैलाब या चित्रपटाचा नायक. (सिर्फ नाम) २२) सन् १९९६ मध्ये बनलेल्या फरेब या चित्रपटाचे संगीतकार.
२६) सैफ अली खान, काजोल आणि आदित्य पांचोली अभिनीत एक फिल्म.
२८) सन् १९९४ मध्ये बनलेल्या अंदाज अपना अपना या चित्रपटाचे निर्देशक.
३१) कोई मेरे XXX पुछे (फिल्म)

### उभे संकेत

१)सन् १९९१ मध्ये बनलेल्या प्रेम कैदी या चित्रपटाचा नायक.
२)जितेंद्रचा नायक बेटा.
३) सन् १९८८ मध्ये बनलेल्या या चित्रपटात खुन भरी मांगची अभिनेत्री.
४) सन् २००३ मध्ये बनलेल्या चित्रपट तेरे नामचा नायक.
५)सन् २००१ मध्ये बनलेल्या या चित्रपटात अजय देवगन, माधूरी दीक्षीत आणि प्रिती झिंटा होते.
६)सन् २००० मध्ये या चित्रपटात पुकारचा नायक.
११)गदर या चित्रपटाचा नायक.
१२)सन् २००२ मध्ये बनलेल्या ये है जलवा या चित्रपटाची नायीका.
१३) अमिताभ बचन, अमृता सिंह, जैकी श्रॉफ आणि मिनाक्षी शेषांद्री अभिनीत एक चित्रपट.
१४)हम XXXXXX रहते है (फिल्म) १५)अजय देवगन, जुही चावला आणि नसीरुद्दीन शाह अभिनीत फिल्म.
१७) ऋषी कपूरचे अभिनेता पिता. (फक्त नांव) २३) XXX कौन (फिल्म) २४) बॉबी देओलचे नायक वडिल. २५) जय XXX माँ (फिल्म) २७) जिते है XXX (फिल्म)२९) सन् १९८३ मध्ये बनलेल्या या चित्रपटात अमिताभ बचन, रती अग्निहोत्री, ऋषी कपूर आणि कादर खान होते. ३०) एक जुने प्रसिद्ध संगीतकार.

## फिल्मी शब्दकोडे

### मागील फिल्मी उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शि | वा | जी | सा | ट | म | | बु | | गु | ल | श | न |
| | | | ज | | नी | ल | म | | ड्डु | | र्मि | |
| प | ह | चा | न | | षा | | | दि | | | ला | |
| रे | | | च | | को | ई | मि | ल | ग | या | | ला |
| श | क्ती | | ले | | ई | श्क | | चा | | | | गु |
| रा | | | स | | रा | | मे | ह | र | बा | न | |
| व | न | | सू | | ला | | | ता | | | ज | |
| ल | | हे | रा | म | | दि | ल | है | तु | म्हा | रा | |
| | ह | | ल | | | ल्ल | | | षा | | ना | |
| | म | | | | बा | गी | | | र | | | |
| | आ | ग | ही | आ | ग | | स | ड | क | छा | प | |
| | प | | | | बा | | ड | | पू | | | रा |
| रा | के | श | रो | श | न | | क | सू | र | | आ | जा |

## देवीच्या वणाचे डाग

१. काळे तिळ व पिवळी राई समप्रमाणात घेऊन कच्चा दूधात वाटून डागावर लावल्याने फायदा होतो.

२. तुरीची डाळ, काकडीचा रस, दूध, गुलाब पाणी १-१ चमचा, १-१ चिमूट हळद, ४०-४५ थेंब लिंबाचा रस, ५ थेंब ग्लिसरिन, तुरीची डाळ पाण्यात भिजवून वाटून घ्यावी. इतर सामग्री मिसळून जाड लेप तयार करुन चेहऱ्यावर लावावा. वाळल्यावर कोमट पाण्याने धुवून घ्यावे. हळू-हळू देवीचे वण नाहिसे होतील.

## चारोळी

मी अगदीच बोलकी
तू खूप अबोल आहे
राजा तुझा रुसवा
मला अगदीच कबूल आहे.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलचे रुग्णसेवेचे कार्य सेवाभावी व कौतुकास्पद

## उद्योजक रतिलाल कोठारी यांचे प्रतिपादन; पोटांचे सर्व विकार शिबिरास रुग्णांचा प्रतिसाद

नगर – प.पू. जैनाचार्य आचार्य श्री आनंद ऋषीजी म.सा महाराजांच्या आशीर्वादाने आनंदऋषीजी हॉस्पिटलचे रुग्णसेवेचे कार्य हे निश्चितच चांगले सेवाभावी व कौतुकास्पद असून परमपूज्य आनंदऋषीजी महाराजांना अपेक्षित अशी चांगली रुग्णसेवा या हॉस्पिटलच्या माध्यमातून गरजू व गरीब रुग्णांना मिळत असून या विश्वासाने अनेक वर्षापासून आम्ही या मोफत शिबिराच्या कार्यासाठी योगदान देत आहोत व यापुढेही देत राहणार असल्याचे उद्गार श्रीरामपूरचे उद्योजक व जेष्ठ सदस्य रतिलाल कोठारी यांनी काढले.

आनंदऋषीजी महाराजांच्या १२६ व्या जन्मदिनानिमित्त आयोजित पोटांचे सर्व विकार या शिबिराच्या उद्घाटना प्रसंगी ते बोलत होते . योगदाते रतिलाल कोठारी व अमित कोठारी यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने या शिबिराचा प्रारंभ झाला या शिबिरासाठी श्रीरामपूरचे रतिलाल घेवरचंद कोठारी व परिवाराने योगदान लाभले आहे.


आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आयोजित पोटांचे सर्व विकार तपासणी शिबिराचे उद्घाटन करताना श्रीरामपूरचे उद्योजक रतिलाल कोठारी, अमित कोठारी व मान्यवर.

रतिलाल कोठारी पुढे म्हणाले या हॉस्पिटलच्या रुग्णसेवा कार्यासाठी आम्हाला योगदान देण्याचे भाग्य मिळत आहे. हे आमचे परमभाग्य असुन अशीच चांगली सेवा या हॉस्पिटलच्या माध्यमातून पुढेही चालु राहो असे आवाहन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या याप्रसंगी प्रायोजक रतिलाल कोठारी, अमित कोठारी तसेच सतीश लोढा, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, डॉ. वसंत कटारिया आदी मान्यवर उपस्थित होते.

शिबिराच्या प्रारंभी डॉ. वसंत कटारिया यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत केले व कोठारी परिवाराचे आभार मानून आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवाभावी कार्याची माहिती दिली. या शिबिराचे तज्ञ डॉक्टर राजेंद्र गुंजाळ, डॉक्टर रोहित वाघ यांनी या प्रसंगी पोटाच्या सर्व विकाराविषयी उपस्थित रुग्णांना मार्गदर्शन करुन या शिबिराचा गरजूंनी अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन केले.

या शिबिरात १२० रुग्णाची तपासणी करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रकाश छल्लाणी यांनी केले.

## गुरुवाणी – १८

### गुरूदेव कायम हृदयात आहेत



सतरा वर्षांनंतर गुरूदेवांच्या भूमीत चातुर्मास करायला मिळत आहे. खरं तर हा माझ्यासाठी वनवास होता. जीवनातील एक चातुर्मास गुरूदेवांच्या चरणी व्हावा ही माझी इच्छा होती. आज याठिकाणी प्रत्येकाच्या हृदयात मला पूज्य गुरूदेवांचे दर्शन होत आहे. एका व्यक्तीने जन्म घेतला. त्यावेळी चिचोंडीत कुंडली पाहून नाव ठेवणारं कोणी नव्हते. जे नाव आईच्या हृदयातून निघते तेच नाव मुलाचे भाग्य असते. जैन आगम याची प्रचिती देते. तीर्थंकर व इतर महनीयांची नावं ज्योतिषाला विचारून नव्हती ठेवली. तसेच चिचोंडी शिराळ येथे जन्मलेल्या गुरूदेवांचे नाव माता हुलसा यांनी नेमीचंद ठेवले. १२७ वर्षांपूर्वी महाराष्ट्रात मोजकेच साधू साध्वी होते. तरीही माता हुलसा यांनी आपल्या मुलाचे नाव तीर्थंकरांच्या नावानुसार ठेवले. तेच नेमिचंद आज आनंदऋषीजी म्हणून आपल्या हृदय सिंहासनावर विराजमान आहेत. आजकाल मुलांना लाडाकोडात वाढवूनही ते कसे वागतील हे सांगता येत नाही. याला जबाबदार कोण हे सांगता येत नाही. सध्या जेन झी मुलांची नावे ऐकून आश्चर्य वाटतं. आगम सांगते की, आईबाप आपुलकीने मुलांना जे नाव देतात ते आशीर्वाद असते. ज्योतिषीचे नाव कामाला येत नाही. याचे सगळ्यात मोठे उदाहरण गुरूदेव आहेत. माता हुलसा शिकलेल्या नव्हत्या पण त्यांना तीर्थंकरांचा मार्ग माहीत होता. त्यांनी मुलाला नाव दिले आणि सन्मार्गही दाखवला. लहानगा नेमिचंद जेव्हा दुसऱ्या मार्गाने जाऊ लागले तेव्हा माता हुलसा यांनी भूमिका घेतली व पूज्य रत्नऋषीजी महाराजांबरोबर त्यांची गाठ बांधली. पुढे गुरूदेवांना इतर कुठे दुसरा सद्गुरू शोधण्याची आवश्यकता पडली नाही. पूज्य रत्नऋषीजी महाराजांनी नेमिचंदला आनंदऋषीजी बनवले. मूर्तीकार अशी मूर्ती घडवतो की नंतर कोणाला ती मूर्ती घडवण्याची गरज पडत नाही. पूज्य रत्नऋषीजी महाराजांनी अशी मूर्ती घडवली की गुरूदेव कायम लोकांच्या हृदयात वसलेत. ऋषी आनंद यांनी आयुष्यातील समस्यांची चर्चा नाही केली पण प्रत्येक समस्येवर उपाय शोधला. प्रत्येकाने संकल्प करा की, 'मी फक्त समस्येवर उपाय शोधेल, समस्येची चर्चा करत बसणार नाही'. गुरूदेवांनी आधी आपले घर एकत्र केले. त्यांनी ऋषी संप्रदायाला एक केले. आज येथील प्रत्येकाने संकल्प करावा की, आपल्या आसपास संप्रदायाची दुही पसरवू देणार नाही. धर्म तुम्हाला जोडतो, संप्रदाय तुम्हाला तोडतो. आपला संघ एक राहील असा दृढ निश्चय करा. गावागावात दर गुरुवारी आनंद चालिसा पाठ सुरू करा.

– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.

# प्रलंबित मागण्यांसाठी सकल माळी समाज ट्रस्टतर्फे १५ ऑगस्टपासून माळीवाडा वेस येथे उपोषण

नगर – सकल माळी समाज ट्रस्टच्यावतीने विविध प्रलंबित मागण्यांसाठी समाजउपयोगी शांततामय उपोषणाचे आयोजन १५ ऑगस्ट २०२६ क्रांती दिन पासून सकाळी १०:०० वाजता माळीवाडा वेस महात्मा फुले यांच्या पुतळ्या जवळ करण्यात आले आहे. मागण्या पूर्ण होईपर्यंत हे उपोषण सुरु राहील. सर्व सामाजिक संघटनांनी या उपोषणाला जाहीर पाठिंबा दिला आहे. कार्यक्रम सकाळी १०:०० वा. छत्रपती शिवाजी महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन शांततामय उपोषणास सुरुवात होईल.

सकल माळी समाज ट्रस्टतर्फे संस्थापक प्रमुख कार्यकर्ते राजेंद्र पडोळे यांनी दिलेल्या निवेदनात विविध सामाजिक व नागरी समस्या मांडण्यात आल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने सार्वजनिक स्वच्छता गृह अजिबात स्वच्छ नसणे, महिलांसाठी कापड बाजार, नवीपेठ, चितळे रोड दिल्लीगेट, माळीवाडा आणि गंज बाजार यासारख्या गर्दीच्या ठिकाणी स्वच्छतागृहांची सोय करणे, सध्या ज्या ठिकाणी स्वच्छता गृह आहेत ती तात्काळ स्वच्छ करण्यात यावी आणि त्या ठिकाणची स्वच्छता कायम ठेवण्यात यावी. डीएसपी चौक व इतर सिग्नलच्या बाजूला सावली निर्माण करणे आणि नगर शहरातील रस्त्यांवर टाकण्यात आलेले स्पीड ब्रेकर हे प्रचलित तांत्रिक मानांकनानुसार करण्यात यावीत. जेणेकरुन वाहनचालकांचे मणके व वाहनांचे स्पेअरपार्ट व्यवस्थित राहतील.

तसेच, सिनेमा हॉलमधील खाद्यपदार्थ विक्रीच्या माध्यमातून होत असलेली आर्थिक लूटमार थांबवणे, महापालिकेच्या माध्यमातून चालविण्यात येत असलेल्या शहर बसमध्ये प्रवास करणाऱ्या विद्यार्थी–विद्यार्थिनींना प्रवास मोफत करणे व त्यांचे पास ऑनलाईन करण्यात यावेत, सकल माळी समाज ट्रस्टच्या वतीने समाजासाठी रुग्णालय उभारण्यात येणार असून त्या साठी रुग्णालयासाठी राखीव असलेली जागा समाज ट्रस्टला देण्यात यावी.

महापालिकेच्या घनकचरा विभागाच्या वतीने घंटा गाड्यांच्या द्वारे कचरा संकलन केले जाते मात्र त्यात ओला व सुका कचरा वेगवेगळा गोळा करून त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यात यावी. नगर शहरातील दारिद्र्यरेषेखालील जनतेला शहरातील सर्व हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय सेवा मोफत करणे आणि शहरातील रहदारीच्या ठिकाणी झालेले अतिक्रमण काढणे यासारख्या विविध मागण्यांसाठी हे आमरण उपोषण होणार आहे.

उपोषणात कार्यकर्ते राजेंद्र पडोळे, प्रसाद कोके, गणेश कोल्हे, गोरख खंदारे, नारायण रोडे, सुधाकर कानडे, संजय कानडे, उ. ड. पुंड, श्री. बनकर सर, ब्रिजेश ताठे, दिलीप झीपुर्डे, विनायक कोके, राजाराम चिपाडे, अर्जुन बोरुडे, डॉ. सत्रे, डॉ. गोरे, भास्कर चौधरी, रमेश सानप, सुनील भिंगारे, फिरोज भाई, नईम भाई, मंत्री पांडुळे, गोरख रसनिंग, बाबा रसनिंग, पिंटू खंगले, कैलास दळवी, प्रकाश जैन, नरेंद्र कर्नावट, गणेश पडोळे, दत्तू पडोळे व इतर मान्यवर सर्व समाज बांधवांनी या समाजउपयोगी उपोषणात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सकल माळी समाज ट्रस्ट, नगर च्यावतीने करण्यात आले आहे.

# अखेर शिक्षकेतर पदभरतीचा मार्ग मोकळा, शासन निर्णय जाहीर

## शिक्षकेतर संघटनेचे शिवाजीराव खांडेकर यांच्या पाठपुराव्याला यश

नगर – महाराष्ट्रातील अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या शिक्षकेतर पदभरतीचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षकेतर संघटनांचे महामंडळाचे सरकार्यवाह शिवाजीराव खांडेकर यांनी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे.

शाळा व शैक्षणिक संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर शिक्षकेतर पदे रिक्त असल्यामुळे कार्यरत कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण पडत असून, त्याचा परिणाम प्रशासकीय कामकाजावर होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आले.शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेत शिक्षक भरती प्रक्रिया ज्या पद्धतीने सुरू करण्यात आली आहे, त्याचप्रमाणे अनेक वर्षापासून प्रलंबित असलेली शिक्षकेतर पदभरती तातडीने सुरू करण्यात येईल,असे आश्वासन प्रधान सचिवांनी शिवाजीराव खांडेकर यांना दिले होते.



पुणे विभागीय सचिव गोवर्धन पांडुळे म्हणाले, शासनासोबत केलेला सातत्यपूर्ण पत्रव्यवहार,विविध बैठका आणि पदभरतीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी केलेल्या अथक प्रयत्नांनंतर शासनाने शिक्षकेतर पदभरतीसंदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना साथीत घेऊन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विविध प्रश्नावर सातत्याने आवाज उठवत आहेत.

५ ऑगस्ट रोजी शासनाचे प्रधान सचिव यांच्यासोबत झालेल्या बैठकीत शिवाजीराव खांडेकर यांनी शिक्षकेतर पदभरतीचा प्रश्न ठामपणे मांडला. राज्यात शिक्षक भरतीची प्रक्रिया सुरू करण्यात आली असताना गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली शिक्षकेतर पदभरती देखील तातडीने सुरू करण्यात यावी.अशी आग्रही मागणी श्री.खांडेकर यांनी केली.

राज्य अध्यक्ष अनिल माने म्हणाले,या आश्वासनानंतर शासनाने ११ ऑगस्ट रोजी शिक्षकेतर पदभरती संदर्भातील शासन निर्णय निर्गमित करून भरती प्रक्रियेचा मार्ग मोकळा केला आहे.या शासन निर्णयानुसार कनिष्ठ लिपिक,पूर्णवेळ ग्रंथपाल आणि प्रयोगशाळा सहाय्यक या संवर्गातील पदे नियमानुसार भरण्यास शासनाने मान्यता दिली आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून रिक्त असलेल्या पदांवर भरती होण्याचा मार्ग खुला झाला असून,शिक्षकेतर कर्मचारी तसेच या पदासाठी पात्र असलेल्या उमेदवारांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.शिक्षण व्यवस्था प्रभावीपणे चालविण्यामध्ये शिक्षकांबरोबरच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे.

शाळेतील कार्यालयीन कामकाज, विद्यार्थी नोंदी, ग्रंथालय व्यवस्था, प्रयोगशाळेतील कामकाज तसेच विविध प्रशासकीय जबाबदाऱ्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून पार पाडल्या जातात. मात्र,अनेक वर्षांपासून पदे रिक्त असल्याने उपलब्ध कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा भार पडत होता. त्यामुळे शिक्षकेतर पदभरतीचा शासन निर्णय हा शैक्षणिक क्षेत्राच्या दृष्टीनेही महत्त्वाचा मानला जात आहे.

या निर्णयामुळे राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून, शिक्षकेतर पदभरतीसाठी सातत्याने संघर्ष करणाऱ्या संघटनांच्या प्रयत्नांना मोठे यश मिळाले आहे.

# भातोडी पारगाव येथील श्री लक्ष्मी नृसिंह मंदिर येथे महाप्रसाद

नगर – भातोडी पारगाव येथील श्री लक्ष्मी नृसिंह मंदिर हे अत्यंत जागृत व स्वयंभू तिर्थक्षेत्र आहे. मंदीराचे दगडी कोरीव बांधकाम अत्यंत पुरातन व देखणे आहे. मेहेकरी नदीच्या तिरावर वसलेल्या या निसर्गरम्य ठिकाणी श्रावणी शनिवार निमित्त १५ ऑगस्ट रोजी धार्मिक कार्यक्रम व विशाल महाप्रसादाचे आयोजन श्री नृसिंह स्वामी सेवा समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

सकाळी ११.०० वा. अभिषेक श्री. राजू विद्ये सौ. सुरेखाताई विद्ये, मा. चेअरमन अहमदनगर शहर सहकारी बँक, मा. नगरसेविका म.न.पा. अहमदनगर यांचे शुभहस्ते दुपारी १.०० वा. महाआरती व विशाल महाप्रसाद शुभारंभ आ. संग्राम जगताप, महापौर सौ. ज्योतीताई गाडे, उपमहापौर अॅड धनंजय जाधव यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाचा सर्व भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री नृसिंह स्वामी सेवा समितीचे वतीने करण्यात आली आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यांत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिला बरोबर केलेला आहे व त्यापोटी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाकडुन विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालु नाही अथवा प्रलंबित नाही व सदर मिळकतीवर कुठल्याही बँकेचे, पतसंस्थेचे अथवा वित्तीय संस्थेचे कर्ज नाही. असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **०७ दिवसाचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता.१३/०८/२०२६.**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी अहिल्यानगर पैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील, मौजे सावेडी येथील बिगरशेती प्लॉट मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे – सर्व्हे नं. २८/१ अ मधील प्लॉट नंबर १५ चे क्षेत्र २९८.१० चौ.मी. हा संपुर्ण प्लॉट मिळकत.

**यांसी चतुःसीमा –**

पूर्वेस ६.00 मीटर रुंदीचा रस्ता दक्षिणेस ६.00 मीटर रुंदीचा रस्ता

पश्चिमेस प्लॉट नं.१४ उत्तरेस प्लॉट नं.१६

**वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक –**

**मुश्ताक नबाब शेख,** रा. परिजात अपार्टमेंट, पाईपलाईन रोड, यशश्री शाळे जवळ, सावेडी, अहिल्यानगर.

**अॅड. समीर वखारे**

पत्ता :– ऑफीस नं.५, पहिला मजला, साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहिल्यानगर. मो. नं. ९०११६७८९९९. ९८६०८०५५५९

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **हबीब जमाल शेख, रा. ९/१२, शहाजी कॉलनी, फकीरवाडा, अहिल्यानगर** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन यांनी सदर मिळकत विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरवून आमच्या अशिलाकडुन विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. तसेच सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क,हितसंबंध,ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ **दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** – जिल्हा तुकडी अहिल्यानगर, पो. तु. ता. नगर पैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे भिंगार येथील मुकुंदनगर भागातील रो–होसिंग मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| स. नं. | प्लॉट नं. | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| ३४१/४ | ९ | २५५.00 चौ. मी. |

**सदर प्लॉट मध्ये मंजूर प्लॅन प्रमाणे लोडबेरींगमध्ये बांधकाम झालेल्या शाहीद सहकारी गृहनिर्माण संस्था या सोसायटी मधील रो–हाऊस ब्लॉक नं. १२ याचे प्लॉट क्षेत्र ४३.५१ चौ.मीटर असुन याचे बांधकाम क्षेत्र २७.२८ चौ.मी. तसेच यातील इले.लाईट मीटर, पाण्याचे नळ कनेक्शनसह संपूर्ण रो – हाऊस मिळकतीबाबत.**

**यांसी चतुःसिमा :–**

पुर्वेस – रस्ता दक्षिणेस – ड्रेनेज लाईन

पश्चिमेस – रो–हाऊस ब्लॉक नं. ११ उत्तरेस – रस्ता

येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.

दि. १३/०८/२०२६, अहमदनगर.

**अॅड. नाजीम अहमद इस्माईल शेख (बीएएलएलबी)**

**अॅड. फैजान फारुक कुरेशी (बीएएलएलबी, डीटीएल)**

पत्ता– जुने कलेक्टर ऑफिसजवळ, डावरे गल्ली, अहमदनगर

मो. ९८८१४३१८६०, ७२७६२५२४७८

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **यश संजय गुगळे, रा. शांती बंगलो, आनंदऋषी हॉस्पिटल मागे, माणिकनगर, अहिल्यानगर** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन यांनी सदर मिळकत विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले आहे. सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क,हितसंबंध, ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण,दान,बक्षिस,पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ **दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** – जिल्हा तुकडी अहिल्यानगर पो.तु.ता.नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे टि पी स्कीम नंबर ३ मधील फायनल प्लॉट नं. २/२ याचे एकुण क्षेत्र ५०६. 00 चौ.मी.

**यांसी चतुःसिमा–**

पुर्वेस – १८.00 मी रुंदीचा रस्ता दक्षिणेस – फायनल प्लॉट नंबर ३

पश्चिमेस – फायनल प्लॉट नंबर १३ उत्तरेस – फायनल प्लॉट नंबर २/१

यात आर.सी.सी. स्ट्रक्चर्समध्ये बांधकाम केलेल्या क्लासिक औरा इमारतीमधील ग्राऊंड फ्लोअर मधील शॉप नंबर २ याचे कारपेट क्षेत्र ४८.३४ चौ. मी. (एकुण सेलेबल ६५.५२ चौ.मी.) या संपुर्ण मिळकतीबाबत.

**यांसी चतुःसिमा–**

पुर्वेस – साईड मार्जिन व १८.00 मी रुंदीचा डि पी रस्ता

दक्षिणेस – शॉप नंबर १ पश्चिमेस – साईड मार्जिन

उत्तरेस – शॉप नंबर ३

येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.

दि.१३/०८/२०२६, अहमदनगर.

**अॅड. नाजीम अहमद इस्माईल शेख (बीएएलएलबी)**

**अॅड. फैजान फारुक कुरेशी (बीएएलएलबी, डीटीएल)**

पत्ता– जुने कलेक्टर ऑफिसजवळ, डावरे गल्ली, अहमदनगर

मो. ९८८१४३१८६०, ७२७६२५२४७८

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खालील परिशिष्टमध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार आमचे आशिल यांचेबरोबर झालेला आहे. सदर व्यवहारापोटी आमचे आशिलांनी विसार रक्कम दिलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे, असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षिसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीज, इजमेंट, अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधीतांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिष्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करून दयावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडून दिले आहे, असे समजून आमचे आशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.१३/०८/२०२६.

**परिशिष्ट मिळकत वर्णन :** जिल्हा अहिल्यानगर, पोट तुकडी नगर नगर पैकी, अहिल्यानगर जिल्हापरिषद हद्दीतील, मे. सह दुय्यम निबंधक साहेब, अ.नगर यांचे कार्य कक्षेतील, मौजे निंबळक येथील मिळकत खालीलप्रमाणे

| गट नं. | हे.आर | रू.पै. |
|---|---|---|
| १९४/१ | ३–७५ | १–८६ |
| | ख.१–४५ | |
| | ५–२० | |

यापैकी उत्तर–पुर्व कोपऱ्यातील ०हे.१० आर पैकी दक्षिण बाजूकडील ०हे.०५आर व त्यावरील शेडसह अशा मिळकतीबाबत.

**यांसी चतु:सिमा :** पुर्वेस : गट नं. १९४/१ पैकी उर्वरीत क्षेत्र,

दक्षिणेस : अजित वेताळ व अश्विनी वेताळ यांची मिळकत,

पश्चिमेस : ९ मीटर रूंदीचा रस्ता,

उत्तरेस : गट नं. १९४/१ पैकी लक्ष्मीकांत शंकरराव कुलकर्णी यांचे मिळकत,

सदर मिळकतीचे विद्यमान मालक –

**श्री. यश राजेंद्र देसर्डा,** रा. नेवासा खुर्द, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर.

**अॅड.महेश मोहन देशपांडे**

लक्ष्मी निवास, नम्रता कॉलनी, पाईपलाईन रोड, सावेडी, अ.नगर. मो.नं.७४४७४९९१७५

## जाहीर नोटीस उत्तर

तमाम लोकांस विशेषतः भारत भागुजी बारस्कर रा. बारस्कर मळा, नागापूर, ता. जि. अहमदनगर यांना या जाहीर नोटीसीस उत्तर देण्यात येते की,

आपण दै. नवामराठा या वृत्तपत्रात दि.२९/०७/२०२६ रोजी पान नं. ८ वर अॅड. धनंजय रावसाहेब वाघ यांचे मार्फत प्रसिध्द केलेली नोटीस व त्यातील मजकूर हा आमचे अशिल **महावीर इन्फ्रा प्लस एल.एल.पी.चे भागिदार हर्षल संतोषकुमार भंडारी व सौ. नयना हर्षल भंडारी** यांनी दिलेल्या माहितीवरुन व सांगितल्यावरुन आपण आमचे अशिला विरुध्द आमचे अशिलाची तसेच इतरांची बदनामी करण्यासाठी जी नोटीस प्रसिध्द केली होती त्या नोटीसीस उत्तर देण्यात येते की, आपण मौजे सावेडी हद्दीतील **सर्व्हे नं. ३२२/१ब/२ब** ही मिळकत आपली असुन त्या मिळकतीत आपले क्षेत्र आहे अशी कथने करुन तसेच सदर क्षेत्रावर आमचे अशिलाने **क्राऊन प्लाझा** या नावाची इमारत बांधलेली आहे.अशी कथने करुन लोकांची व मे. कोर्टाची दिशाभुल करण्याचे उद्देशाने **स्पे.मु.नं. १६२/२०२३** या दाव्यात **निशाणी १३१** ला अर्ज देऊन व वस्तुस्थिती मे. कोर्टापासुन लपवुन ठेऊन मे. कोर्टाकडून मनाई हुकूम मिळवलेला होता. आमचे अशिलास सदर मनाई हुकूमाची माहिती झाल्यानंतर आमचे अशिलाने सदर दाव्यात त्वरीत हजर होऊन आपण **स्पे.मु.नं. १६२/२०२३** या दाव्यात निशाणी **१३१** वर घेतलेला हुकूम हा मे. कोर्टाची दिशाभूल करुन व जी वाद मिळकत नाही ती वाद मिळकत दाखवुन स्थगिती घेतली होती म्हणुन आमचे अशिलाने व इतरांनी त्या दाव्यात **निशाणी १५५ व १५८** वर अर्ज देऊन आमचे अशिलाची मिळकत ही **सावेडी येथील सर्व्हे नं. ३२२/१ब/२अ/अ/ब/क/ड म्हणजेच प्लॉट नं. १ ते ५** हे आमचे अशिलाने श्री. मोहनलाल मानधना व इतरांकडून खरेदीने घेतलेले असुन सदर मिळकतीशी आपला कोणताही हक्क व हितसंबंध नाही अगर सदर मिळकत आपल्या मालकीची कधीही नव्हती. आमचे अशिलाने सदर मिळकतीत बांधकाम करण्यासाठी अहमदनगर महानगरपालिका यांचेकडे अर्ज करुन बांधकाम परवानगी घेतलेली होती परंतु सदर बांधकाम परवानगी देताना महानगरपालिकेकडून नजर चुकीने मिळकत नंबर चुकलेला होता हि चुक आमचे अशिलाने महानगरपालिकेचे निदर्शनास आणल्यानंतर त्यांनी सदर चुक दुरुस्त केली आहे तसेच मा. उच्च न्यायालयात **रिट पिटीशन नं. ५५/२०२६** मध्ये महानगरपालिकेने आमचे अशिला विरुध्द कोणताही आदेश केलेला नाही. केवळ त्यांनी त्यांचे मत नोंदवले आहे असा स्पष्ट उल्लेख मा. उच्च न्यायालयाने केलेला असल्याने त्याचप्रमाणे आमचे अशिलांनी **मा. सिव्हील जज्ज सि.डी. अहमदनगर कोर्ट नं.–८** यांचे समोर संपुर्ण वस्तुस्थिती, कागदपत्रे त्याचप्रमाणे आमचे अशिलाचे मालकीच्या असलेल्या **सावेडी येथील सर्व्हे नं. ३२२/१ब/२अ/अ/ब/क/ड म्हणजेच प्लॉट नं. १ ते ५** मिळकतीचे वेगळे ७/१२ उतारे मे. कोर्टाचे निदर्शनास आणल्या नंतर **मे.दिवाणी कोर्टाने या पुर्वी निशाणी १३१ वर आमचे अशिला विरुध्द जो मनाई हुकूम दिलेला होता तो प्रथम दर्शनी चुक असल्याबाबत मान्य करुन दिलेला मनाई हुकूम उठवण्यात आलेला आहे. तसेच क्राऊन प्लाझा या मिळकतीशी भारत भागुजी बारस्कर यांचा कोणताही संबंध नाही हेही मे. कोर्टाने स्पष्टपणे नमुद केलेले आहे. हि वस्तुस्थिती असतानाही केवळ आमचे अशिल व क्राऊन प्लाझा मिळकतीतील दुकानांची ज्यांनी ज्यांनी खरेदी केलेली आहे त्यांची दिशाभुल करावी व गैरमार्गाने त्यांचेकडून आर्थिक लाभ घ्यावा म्हणुन सदरचा दावा दाखल केलेला आहे.**

या जाहिर नोटीसी उत्तराने सर्वांना कळविण्यात येते की, **क्राऊन प्लाझा** या पाईपलाईन रोडवरिल मिळकतीबाबत मे. कोर्टाने जो **निशाणी १३१** वर मनाई हुकूम दिलेला होता सदर मनाई हुकूम हा मे. कोर्टाची दिशाभुल करुन घेतलेला असल्याने व त्याबाबत मे. कोर्टाची खात्री पटलेली असल्याने तो मे. कोर्टाने रद्द केलेला आहे. तसेच सदर मिळकतीशी **भारत भागुजी बारस्कर** यांचा कोणताही हक्क हितसंबंध नाही हि बाब स्पष्टपणे नमुद केलेली असल्याने सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे त्यामुळे मिळकतीबाबत कोणताही गैरसमज जाणिवपुर्वक पसरवला जाऊ नये म्हणुन सदर जाहिर नोटीस उत्तर हे आमचे अशिलाने प्रसिध्द केले आहे. त्याचप्रमाणे भारत भागुजी बारस्कर यांनी आमचे अशिल व इतरांबाबतत ज्या जाहिर नोटीसा प्रसिध्द केल्या, त्यांची बदनामी केली. तसेच मे. कोर्टाची दिशाभुल केली म्हणुन भारत भागुजी बारस्कर रा. बारस्कर मळा यांचे विरुध्द योग्य ती दिवाणी व फौजदारी कारवाई करतील याची नोंद घ्यावी.

**महावीर इन्फ्रा प्लस एल. एल पी चे भागीदार**

**हर्षल संतोष भंडारी व सौ. नयना हर्षल भंडारी**

**अॅड. वेद किशोर देशपांडे**

ऑफिस:–कोर्ट यार्ड, ई –बिल्डिंग, पहिला मजला, तारकपुर बस स्टॅण्ड समोर, अहमदनगर, मो.नं. ९६०४६९७४३९

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

